सन 2016-17

विद्यापीठ अनुदान आयोग व

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे,

न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर

मराठी विभाग यांचे संयुक्त विद्यमाने

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

## राष्ट्रीय चर्चासत्र

# यशवंतराव चव्हाण : व्यक्ती आणि वाङ्मय




(प्रोसिडिंग)

ISBN-978-93-83401-45-1

दि.२३ व २४ सप्टेंबर २०१६

संपादक: डॉ.लक्ष्मीकांत येळवंडे

विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत

# यशवंतराव चव्हाण : व्यक्ती आणि वाङ्‌मय

राष्ट्रीय चर्चासत्र

दि. २३ ते २४ सप्टेंबर

आयोजक

मराठी विभाग

न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर

प्रमुख मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. भास्करराव झावरे

सल्लागार संपादक

डॉ. सुनीता भांगेपाटील

संपादक

डॉ. लक्ष्मीकांत येळवंडे

संपादक मंडळ

प्रा. मीना कोहोक

डॉ. महेबुब सय्यद

डॉ. नवनाथ येठेकर

**ISBN – 978-93-83401-45-1**

# अनुक्रमणिका


| अ.नं. | शोधनिबंधाचे नाव | लेखकाचे नाव | पान नं. |
|---|---|---|---|
| १ | यशवंतराव चव्हाण : एक बहुआयामी व्यक्तित्व | डॉ. पडवळ प्रमोद भगवान | १ ते ६ |
| २ | यशवंतरावांच्या भाषणातून व्यक्त होणारा साहित्यिक दृष्टिकोन | प्रा.डॉ. मुखेडकर प्रेमला | ७ ते १२ |
| ३ | यशवंतरावांची वैचारिक भूमिका | प्रा.डॉ. हेरोळे गजानन गोपाळराव | १३ ते १५ |
| ४ | यशवंतरावांचे शैक्षणिक योगदान | डॉ. शिंदे अशोक | १६ ते १८ |
| ५ | यशवंतरावांचे साहित्यिक योगदान | प्रा. डॉ. पवार विनायक | १९ ते २२ |
| ६ | यशवंतरावांचे भाषा व साहित्यिक विचार | डॉ. जाधव प्रतिभा सुरेश | २३ ते २५ |
| ७ | यशवंतराव चव्हाण यांच्या भाषणातून व्यक्त होणारा साहित्यिक दृष्टिकोन | प्रा. डॉ. पाटील–कौलवकर विश्वास शं. | २६ ते ३१ |
| ८ | यशवंतराव चव्हाण यांचे लष्करी क्षेत्रातील कार्ये | डॉ. तोडकर बी.डी. | ३२ ते ३९ |
| ९ | यशवंतरावांचे साहित्यिक योगदान | प्रा.डॉ. मोरे अरूणा | ४० ते ४६ |
| १० | यशवंतराव चव्हाण यांची सामाजिक भूमिका | प्रा. भद्रे अनिता महादेव | ४७ ते ५३ |
| ११ | यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय विचार | प्रा. डॉ. सोनटक्के राजाराम | ५४ ते ५८ |
| १२ | यशवंतरावांची वाङ्मयीन जडणघडण | प्रा. नांदगावकर अनुप अरूण | ५९ ते ६२ |
| १३ | यशवंतराव चव्हाणांचा साहित्य आणि साहित्य प्रकारविषयक दृष्टिकोन | प्रा.डॉ. राठोड विनोद दे. | ६३ ते ६७ |
| १४ | 'भूमिका' मागची भूमिका | प्रा. डॉ. काळे गोविंद | ६८ ते ७२ |
| १५ | 'यशवंतरावांचा कलाविषयक दृष्टिकोन' | प्रा. शिंदे एन.व्ही. | ७३ ते ७५ |
| १६ | यशवंतराव चव्हाणांचे भाषा व साहित्य विषयक विचार | प्रा.डॉ. देव (निमकर) मीनाक्षी | ७६ ते ७९ |
| १७ | यशवंतराव चव्हाणांचे आत्मचरित्र लेखन | प्रा. पैठणकर क्रांती हरेश | ८० ते ८४ |

# यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय विचार

११

प्रा. डॉ. सोनटक्के राजाराम
(उपप्राचार्य)
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आ टी.

यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयायी होते. त्यांचे वाङ्मय विविधांगी स्वरुपाचे दिसून येते. त्यांनी आपल्या वाङ्मयातून अनुभवांचे प्रभावी असे आविस्करण केलेले दिसून येते. त्यांच्या साहित्याचा विचार केला तर सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, कृषिविषयक, भाषाविषयी, राष्ट्राविषयी, व्यापार, उद्योग व संरक्षण इत्यादींविषयीचे विचार मांडलेले दिसून येतात. आत्मचरित्र, ललित, निबंध, विविध लेख, पत्रे भाषणे, दिक्षांत समारंभातील भाषणे यातून त्यांची वैचारिकता दृष्टिक्षेपात येते.

१९३० ते १९३७ या काळात यशवंतरावांच्या जीवनात शैक्षणिक प्रगतीबरोबरच राजकीय विचारांचा प्रवास चालू होता. या काळातच त्यांच्या काँग्रेस निष्ठेला समाजवादी निष्ठेची जोड मिळत होती. संस्कारक्षम वयात त्यांचे असलेले चौफेर वाचन, चिंतन व चर्चा यामुळे यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय व सामाजिक जाणिवा बालवयातच प्रगल्भ झाल्या होत्या. आपल्या आजूबाजूस घडत असणा—या राजकीय सामाजिक परिवर्तनाचा व चळवळीचाही त्यांच्यावर परिणाम होत होता. लो.टिळक, म.गांधी, पं.जवाहरलाल नेहरु, म.फुले, एस.एम.रॉय, वि. रा.शिंदे, त्यांचे मित्र राघु आण्णा, आत्माराम बापू पाटील, ना.ग.गोरे, एस.एम. जोशी यासारख्या विचारवंतांच्या सहवासात यशवंतरावांचे जीवन घडत होते. समाजवादी आणि रॉयवादी विचारांच्या संपर्कात यशवंतरावांची राजकीय मूस घडत होती. समाजवादी व रॉयवादी विचारसरणीमूळे यशवंतरावांची मन:स्थिती द्विधा झाली होती. यावि यी यशवंतराव म्हणतात की, ''मनाची अशी द्विधा अवस्था झाल्याशिवाय विचारांचा विकास होत नाही.'' याचाच अर्थ असा की, याच काळात यशवंतरावांच्या मनावर या दोन्ही विचारांचे प्रभाव एकाच वेळी संस्कार करीत होते आणि त्यातूनच त्यांच्या राजकीय विचारांना दिशा मिळत होती. १९३० आणि १९३२ सालच्या कायदेभंगाच्या चळवळीत यशवंतरावांनी उडी घेतली. १८ महिन्यांचा कारावास भोगून शालेय जीवनात आपला राजकारणी पिंड घडवायला त्यांनी सुरुवात केली होती. याच काळात मॅट्रिक बी. ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण करुन त्यांनी राजकारणाचे धडे गिरवले होते.

प्रारंभी देशाच्या राजकारणाची सूत्रे महाराष्ट्राकडेच होती. महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर न्यायमूर्ती रानडे, गोपाळकृष्ण गोखले आणि लोकमान्य टिळक अशी नावे झळकत होती. याचवेळी सत्यशोधक चळवळ व ब्राम्हण—ब्राम्हणेतर चळवळ मूळ धरत होती. राष्ट्रीय काँग्रेसमध्ये म.गांधीजींचा प्रभाव वाढलेला होता खेडयापाडयातील निरक्षर व दरिद्री समाजाला जागृत केले तरच चळवळीची ताकद वाढू शकेल हे काँग्रेसच्या इतिहासात गांधीजींनीच सर्वप्रथम ओळखले होते. त्यादृष्टीने त्यांनी पावले उचलली. 'खेडयाकडे चला' हा संदेश दिला. ग्रामीण

जनतेला जागृत करण्याच्या निमित्ताने खेडया– पाडयात सभा होऊ लागल्या. या सर्व घडामोडींचा यशवंतरावांच्या मनावर कळत–नकळत प्रभाव पडत होता. देवराष्ट्रातील वास्तव्यात तळागाळातील माणसांचे जीवन त्यांना कळले होते. कराडमधील विचार प्रवाहांचे त्यांच्यावर संस्कार झाले होते. राजकीय कार्यकर्त्याला आवश्यक असणारी पार्श्वभूमी त्यांना आपोआप प्राप्त होत होती. कॉंग्रेसचा एक सामान्य कार्यकर्ता म्हणून त्यांची राजकीय प्रवासाची सुरुवात झाली. त्यानंतर मुख्यमंत्री ते केंद्रीय मंत्री एवढया प्रवासात पक्षाची भूमिका मांडावी लागली. यातून त्यांचे राजकीय विचार व्यक्त झाले आहेत, सोनियाचा दिवस, लोकशाही विकेंद्रिकरण, बँकाकडून अपेक्षा, सीमा प्रश्न, महाराष्ट्राच्या भवितव्याची सफर, लोकशाहीतील नियोजन जगन्नाथाचा रथ, लोकशाही राज्यकारभाराची चौकट, विकेंद्रिकरण लोकशाही जीवनपध्दतीचा पाया, नव्या जीवनाची साधनशक्ती, समाजवादाचा मार्ग, लोकशाहीतील प्रशासन, सामाजिक प्रगतीच्या प्रेरणा, कॉंग्रेसची ऐतिहासिक भूमिका, पक्षसंघटनेच्या बदलत्या दिशा, आर्थिक प्रश्नांचे राजकीय स्वरुप, लोकशाही आणि प्रत्यक्ष आंदोलन, भारताची सद्य:स्थिती: एक चिंतन, बांधीलकीचे राजकारण, पुरोगामी आर्थिक धोरण, पक्षावर अभंगनिष्ठा, या भाषण लेखनातून त्यांनी राजकीय विचार व्यक्त केले आहेत.

यशवंतराव चव्हाण यांच्यावर महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरु यांचा प्रभाव मोठया प्रमाणावर होता. त्यांची जडण–घडण मुळातच धर्मनिरपेक्ष विचारांच्याच चौकटीत झाली होती. यशवंतराव चव्हाण म्हणतात, ''भारताचा राष्ट्रवाद बळकट करावयाचा असेल तर धर्मनिरपेक्ष विचारावरच तो करावा लागेल. धर्मनिष्ठित राष्ट्रवाद हा या देशातील राष्ट्रवादाचे तुकडे करणारा विचार ठरेल. राज्य संस्थेने एका धर्माचा आश्रय करुन येथे चालणार नाही कित्येक कोटी लोक इथे इतर धर्माचेही राहत आहेत. या अनेक धर्माच्या अनेक जातीच्या अनेक वंशाच्या समाजामध्ये सर्वांना एकत्र बांधणारी मोठी शक्ती म्हणून धर्मनिरपेक्ष राज्याच्या विचाराचाच स्वीकार अपरिहार्य ठरतो आणि तसा तो करावा लागेल म्हणूनच मी असे म्हणेल की, ज्या दिवशी हा आमचा विचारांचा पाया भुसभुशीत होईल, त्या दिवशी आमचा राष्ट्रवाद व लोकशाही धोक्यात येईल.''

यशवंतराव चव्हाण यांना धर्मनिरपेक्ष लोकशाही महत्त्वाची वाटते. भारतीय लोकशाहीमध्ये सर्व धर्मांना समानभाव ठेवणे. सर्वांना समान विकासाची संधी देणे. धर्म ही प्रत्येकाची व्यक्तिगत बाब असून राज्यसंस्थेचा तिच्याशी संबंध नाही. सार्वजनिक हित आणि भौतिक समृध्दी निर्माण करण्याचे काम राज्यसंस्थेचे आहे. अध्यात्म आणि धर्मशास्त्र यांच्यात हस्तक्षेप करण्याचे काम राज्यसंस्थेने करु नये. असेही ते आपले मत मांडतात, स्वातंत्र्य मिळवण्यासाठी या देशातील सर्व जाती धर्माच्या लोकांनी एकजुटीने खांद्याला खांदा लावून काम केले. तर काहींनी आपल्या देशासाठी स्वत:चे रक्त सांडले. प्राणांची आहुती दिली. त्यामुळे या देशातील स्वातंत्र्यावर व लोकशाहीवर सर्वांचाच हक्क आहे. सम्राट अशोक, छत्रपती शिवाजी महाराज, अकबर यांनी राज्यसंस्था व धर्म यांची कधीही चूक होऊ दिली नाही, मात्र व्यक्तिगत जीवनात धर्मकारण आणि धर्मकल्पना यांना

त्यांनी श्रेष्ठ स्थान दिलेले आहे. असेही यशवंतराव चव्हाण उदाहरणे देऊन करतात.

राष्ट्रवादाविषयी आपले मत मांडतांना यशवंतराव चव्हाण म्हणतात ''भारतीय प्रजासत्ताकाचे समान नागरिकत्व हेच राष्ट्राच्या विविधतेचे प्रतिक स्वातंत्र्याच्या लढयात व त्यानंतर आपण राष्ट्रवादाच्या आधुनिक काळात निधर्मी तत्त्व अंगीकारले. हे एका विशिष्ट धर्माचे वा संस्कृतीचे प्रभूत्व मानण राष्ट्रवादाशी पूर्णपणे विसंगत आहे. परंतु दुर्दैवाने आपल्यातील काही लोकां पटत नाही. धर्म व राष्ट्र एकच आहे, असे ते मानतात. धर्मनिष्ठ राष्ट्रवा धर्मातित राष्ट्रवाद यांच्या संघर्षातून काय घडेल ते आपल्याला माहीत अ परंतू फाळणीनंतर भारत हे बहुधर्मी, आणि धर्मातीत राष्ट्र म्हणून मानले आहे आमची अढळ निष्ठा आहे.'' स्वतंत्र भारतात धर्मनिष्ठ व धर्मातील राष्ट्रवाद समाजाला काहीच उपयोग होणार नाही. उलटपक्षी जमातवाद वाढण्यास होईल यासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे.

सामाजिक क्रांतीचा विचार सांगणारा पुरोगामी राष्ट्रवाद हा एक राष्ट्रवा पैलू आहे असे ते सांगतात. सर्वधर्मसमभाव याविषयी सर्व धर्मांना संधी असताना स्वातंत्र्य, समता, बंधूता व न्याय या भारतीय राज्यघटनेतील तत्त्वां आधारे प्रत्येक धर्माची चिकित्सा होणे आवश्यक असल्याचे ते प्रतिपादन करत भारतात धर्म चिकित्सेची एक परंपरा आहे. स्वातंत्र्य मिळाले तरी सामाजिक क्र होणे आवश्यक आहे. यशवंतराव चव्हाण राजकीय आंदोलनात सक्रिय सहभ होते. तसेच ते समाजिक परिवर्तनासाठीही प्रयत्न करत होते.

यशवंतराव चव्हाण राष्ट्रवादाचा विचार करताना तो आंततरराष्ट्र परिस्थितीच्या संदर्भात झाला पाहिजे असे म्हणतात, ''भारतीय राष्ट्रवाद हा ए दृष्टीने आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा मागोवा घेत-घेत प्रगती करणारा राष्ट्रवाद आ एका दृष्टीने हा फरक एकोणिसाव्या शतकातील राष्ट्रवाद आणि विसाव शतकाच्या उत्तरार्धातील राष्ट्रवाद यामधीलच आहे. राष्ट्रवादाचे हे स्वरुप पहिल महायुध्दानंतर बदलण्यास प्रारंभ झाला व दुस-या महायुध्दानंतर ते आणखीन बदलले. अॅटमबॉंब, हैड्रोजनबॉंब यांच्या शोधामुळे तर राष्ट्रवादाचा विचा आंतरराष्ट्रीय परिस्थिती संदर्भात करणे आवश्यक होऊन बसले आहे. या काळा जगाचा विचार न करता फक्त आपलाच विचार करणारी राष्ट्रवाद हा आक्रमक कडव्या राष्ट्रवादापेक्षा वेगळा असण्याची गरज वाढते'' भारतीय राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रीय राष्ट्रवाद याविषयी ते अभ्यासपूर्वक मत मांडताना दिसतात राष्ट्रवादाला ते मानवी इतिहासातील एक टप्पा मानतात. राष्ट्रवादाच्या विचारात तात्त्विक विचारालाही महत्त्व देतात. मानवी जीवनाच्या प्रवासाची सुरुवात लहान-लहान टोळयांकडून ते जगाच्या विशाल अशा कुटूंबापर्यंत होत असते राष्ट्रवाद हे मानवी मुक्कामाचे ठिकाण नाही. तो एक मैलाचा दगड आहे, हा विचार आपण केला पाहिजे. राष्ट्रवादाविषयीचे अधिक भाष्य जाणून घ्यायचे असेल तर न्या.रानडे, गोखले, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पंडित नेहरु यांचे विचार पहाणे महत्त्वपूर्ण ठरेल. रविंद्रनाथांनी शुध्द मानवतावादी राष्ट्रवादाचा पुरस्कार केलेला आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यानंतर भारत एक राष्ट्र

म्हणून जगात उदयास आले असले तरी राष्ट्रीयत्त्वाची भावना नवीन नाही असे ते सांगतात.

"आमच्या परंपरेतून आम्ही एक होतो. आमच्या संस्कृतीतून आम्ही एकत्र आलो. आम्हाला एक ऐतिहासिक वारसा आहे. आणि त्यानेच आम्हाला एकत्र राहण्याची शिकवण दिली आहे." परंपरा, संस्कृती व ऐतिहासिक वारसा या गोष्टी फारच महत्त्वपूर्ण असल्याचे ते सांगतात.

भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यानंतर काही वर्षातच आनंद, उत्साह ओसरला. व भारतीय राष्ट्रीय एकात्मतेसमोर काही अडचणी निर्माण झाल्या. काही आव्हाने उभी राहिली. धर्मद्वेश, जातीयकलह, प्रादेशिकता, भाषिक अहंकार असे प्रश्न उभे राहिले आहेत. त्यासाठी सर्वांनी मिळून एकत्रित प्रयत्न करण्याची गरज असल्याचेही ते सांगतात. आपला आर्थिक विकास झपाटयाने व्हावा, यासाठी राज्याराज्यात संघर्ष निर्माण होतो, यासाठी लोकशाहीच्या संदर्भात काही नियम आखून घेतले पाहिजेत. यामुळे राष्ट्रवादाला तडा जाणार नाही, याची काळजी घेणे व संयम बाळगणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रदेशाची प्रगती करावयाची असेल तर राष्ट्रीय नियोजनाच्या माध्यमातून ती होऊ शकते. भाविकता व प्रादेशिकता यामध्ये प्रादेशिकता हे अंतिम मूल्य असता कामा नये. भारतीय लोकशाही ही भारतीय माणसाला सन्मानाचे जीवन बहाल करु शकते. लोकशाहीमुळेच सर्वसामान्य कार्यकर्ता देशाच्या उच्च स्थानापर्यंत पोहचू शकतो याचा विश्वास त्यांना होता. भारताची संसद ही ज्याप्रमाणे राष्ट्रीय ऐक्याचे प्रतिक आहे तशी ती भारतीय ऐक्याचा मुलाधार आहे. या राज्यघटनेने दिलेले समान नागरिकत्व व सार्वभौम अशी संसद महत्त्वाची आहे.

भारताने स्वीकारलेल्या लोकशाही शासन पध्दती विषयीचे मत मांडताना ते म्हणतात, "पहिली विशेषता ही की, संसदीय लोकशाहीत कायद्याचे राज्य असते. दुसरे असे की, लोकशाहीत विशिष्ट कालावधीनंतर प्रौढ मताधिकारांच्या तत्त्वावर निवडणुका होत असतात. आणखी विशेषता म्हणजे जनतेला विचारस्वातंत्र्य, सभास्वातंत्र्य, असे काही मूलभूत अधिकार असतात. या मूलभूत अधिकारांचे रक्षण करण्यासाठी स्वतंत्र न्यायव्यवस्था असते. संसदीय लोकशाहीमध्ये सरकार बदलता येते. एका निवडणुकीत ते पराभूत होऊ शकते. विधिमंडळात वा संसदेत निवडून जायची कोणत्याही व्यक्तीला मूभा असते. सर्व प्रौढ नागरिक मतदान करु शकत असल्यामुळे त्यांना पाहिजे तसे सरकार अस्तित्वात येऊ शकते. मतदारावर कोणतेही दडपण येऊ नये म्हणून मतदान गुप्त पध्दतीने होते. या सर्व गोष्टी ध्यानात घेतल्या म्हणजे संसदीय लोकशाहीत मतपरिवर्तनाला भरपूर वाव असतो हे स्पष्ट होते" असे लोकशाहीबद्दलचे विचार ते मांडतात.

एकूणच यशवंतराव चव्हाण यांचा राजकीय विचार लक्षात घेतला असता असे लक्षात येते की, स्वत:चे स्वत:साठी, स्वत:पुरते न राहता व्यापक राष्ट्रहितासाठी जी त्यागाची वृत्ती असावी लागते. ती यशवंतराव चव्हाण यांच्याकडे निसर्गत: होती. पण हेच आपल्या आयु याचे ध्येय आहे. हे तेंव्हाच अधोरेखित झाले असावे. लौकिकार्थाने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ते देशाचे उपपंतप्रधान, हा एक सत्तेच्या सारीपाटातील अतिशय महत्त्वाचा कालखंड आहे.

अनेक मूलभूत विषयासंबंधी घेतलेले निर्णय, त्यांचे लोकमानसावर झालेले परिणाम, प्रसंगी अभिनंदनाचा वर्षाव, तर अनेक वेळा परखड टीकेचे बळी, पण हे सर्व निभावून नेतांना ज्या एका सन्यस्त वृत्तीची गरज असते, त्याची बीजेही त्यांच्या कारकीर्दीत पहिल्या कालखंडातीलच आहेत असेच म्हणावे लागेल.

संदर्भ :—


१) चव्हाण यशवंतराव:(१९७९) भूमिका, प्रेस्टीज पब्लिकेशन पुणे.

२) प्रधान राम: (२०००) शब्दांचे सामर्थ्य, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई.

३) चव्हाण यशवंतराव:(१९६१) शिवनेरीच्या नौबती, व्हिनस प्रकाशन पुणे.

४) चव्हाण यशवंतराव: (१९७०) युगांतर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे.

५) जाधव पंजाबराव:(१९७०) यशवंतराव चव्हाण जीवनदर्शन, कर्मवीर प्रकाशन पुणे.

६) चव्हाण यशवंतराव: (२०१२) कृष्णाकाठ, रोहन प्रकाशन, मुंबई प्रथमावृत्ती १९८४

न्यू आर्टस्, [illegible]

# मराठी विभाग

यांच्या संयुक्त विद्यमाने

# राष्ट्रीय चर्चासत्र

## ‘‘यशवंतराव चव्हाण : व्यक्ती आणि वाङ्मय’’

## - प्रमाणपत्र -

प्रा./डॉ./श्री./श्रीमती. राजाराम सोनटक्के, कला, वाणिज्य महा. आष्टी, जि. बीड महाविद्यालय यांनी दि. २३ व २४ सप्टेंबर २०१६ रोजी संपन्न झालेल्या ‘‘यशवंतराव चव्हाण : व्यक्ती आणि वाङ्मय’’ या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात तज्ज्ञ मार्गदर्शक/अध्यक्ष/चर्चाप्रवर्तक/शोधनिबंध वाचक/ सहभागी प्राध्यापक म्हणून सहभाग घेतल्याबद्दल हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

Principal
Adv.B.D.Hamberde Mahavidyalaya
Ashti Tal. Ashti, Dist. Beed

| | | | |
|---|---|---|---|
| डॉ. लक्ष्मीकांत येळवंडे<br>समन्वयक | डॉ. सुनीता भांगेपाटील<br>मराठी विभाग प्रमुख | प्रा. रोहिदास कोल्हे<br>उपप्राचार्य | डॉ. भास्करराव झावरे<br>प्राचार्य |

2016-17

ISSN-2319 9318

International Multilingual Research Journal

Vidyawarta®

Special Issue Jan.2017

# राज्यस्तरीय चर्चासत्र

कुकडी एज्युकेशन सोसायटीचे

## सावित्रीबाई कला महाविद्यालय

पिंपळगाव-पिसा, ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर

नॅक मुल्यांकित ''सी'' दर्जा प्राप्त

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली अंतर्गत चर्चासत्र

# १९६० नंतरचे ग्रामीण साहित्य

दि. ०३ व ०४ जानेवारी २०१७

संपादक
प्रा. डॉ. देवीदास शेटे

अतिथी प्रकाशक
प्राचार्य शांतीलाल घेगडे

## || Index ||

1) १९६० नंतरची ग्रामीण कादंबरी
प्रा.स्वाती शिवाजी चौधरी, देवळाली प्रवरा, ता.राहुरी, जि.अहमदनगर || 08

2) १९६० नंतरच्या ग्रामीण कवितेमधील स्थित्यंतरे
प्रा. डॉ. अतुल चौरे–प्रा. चिंतामण धिंदळे, पनवेल, जिल्हा रायगड || 10

3) ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य प्रवाह
डॉ. भास्कर शेळके जुन्नर || 15

4) १९६० नंतरच्या ग्रामीण कथेचे बदलते स्वरूप
प्रा. डॉ. विलास धनवे, कर्जत, जिल्हा अहमदनगर || 18

5) १९६० नंतच्या काळातील ग्रामीण साहित्य संकल्पनेतील स्थित्यंतरे
प्रा. डॉ. शिरीष लांडगे पाटील, भेंडे ता. नेवासा जि.अहमदनगर || 21

6) ग्रामीण साहित्य चळवळ : स्वरूप, भूमिका व फलश्रुती
डॉ. सुधाकर शेलार, अहमदनगर. || 23

7) मराठी ग्रामीण कादंबरी व बदलते समाजवास्तव
प्रा. डॉ. द. के. गंधारे , राजूर || 29

8) १९६० नंतरची ग्रामीण कविता
संभाजी शिवाजी घोलप ,डोंगरगण, ता. आष्टी जि. बीड || 31

9) आशा बगे यांच्या १९६० नंतरच्या ग्रामीण कादंबऱ्या
प्रा. मच्छिंद्र रामचंद्र गोंटे-प्रा. डॉ. राजेंद्र ठाकरे || 35

10) साठोत्तरी ग्रामीण साहित्याची चळवळ
डॉ. प्रतिभा सुरेश जाधव, लासलगाव ता.निफाड जि.नाशिक || 37

11) ग्रामीण साहित्याची समीक्षा
प्रा. जाधवर शशिकांत श्रीरंग || 39

12) मराठी साहित्यातील १९६० नंतरचे वाङ्मय प्रवाह
प्रा. डॉ. रमेश जयवंत खिळदकर, धानोरा ता.आष्टी, जि.बीड || 41

13) स्त्री कवयित्रींची ग्रामीण कविता
प्रा. डॉ. गुंफा कोकाटे, बेलापूर, ता.श्रीरामपूर,जि.अ.नगर || 45

14) १९६० नंतरचा आशा बगे यांचा 'मारवा' कथा संग्रह
प्रा. डॉ. रघुराज एम. कुरुमकर पिंपळगाव पिसा, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर. || 48

15) साठोत्तरी ग्रामीण साहित्याचे बदलते स्वरूप
प्रा. डॉ. विशाल प्रकाश लिंगायत, बार्शी, जि. सोलापूर || 50

https://sites.google.com/site/vidyawartajournal http://www.vidyawarta.blogspot.com

16) ग्रामीण कवी इंद्रजीत भालेराव यांचे काव्य
प्रा डॉ सपकाळ वसंत दामोधर, नेवासा || 55

17) १९६० नंतरची ग्रामीण कथा
प्रा. डॉ. सदाशिव सरकटे, शिवाजीनगर, ता.गेवराई जि.बीड || 56

18) ग्रामीण कवितांचा चिकित्सक अभ्यास
प्रा. डॉ. संगिता शेळके, अहमदनगर || 59

19) १९६० नंतरच्या ग्रामीण कादंबरीचे बदलते स्वरूप
प्रा.डॉ. देविदास मल्हारी शेटे, पिंपळगांव पिसा || 63

20) वामन जाधव यांच्या साहित्यातील कृषिसंस्कृतिचे चित्रण
प्रा. डॉ अशोक शिंदे , नेवासा ||65

21) १९६० नंतरची मराठी ग्रामीण कथा
प्रा. डॉ. राजेंद्र वडमारे, सात्रळ,ता.राहुरी,जि.अहमदनगर || 66

22) समकालीन हिंदी कविता के प्रमुख हस्ताक्षर वीरेन डंगवाल
प्रा. शितोळे नामदेव ज्ञानदेव, पिंपळगाव पिसा, तह.श्रीगोंदा, || 73

23)१९६0 नंतरच्या ग्रामीण कथा
श्री.गोरक्षनाथ किसन घोलप, पुणे || 76

24) ग्रामीण जीवनाचे चित्रण करणाऱ्या कांदबऱ्या
प्रा. डॉ. सुनिता दि. देशमुख, राजगुरुनगर || 79

25) साठोत्तरी ग्रामीण मराठी कथा वाङमयात सखा कलाल यांचे योगदान
श्रीमती दातीर मिना गोविंद, राहुरी, जि. अहमदनगर || 86

26) १९६० नंतरची ग्रामीण कथा
प्रा.डॉ. राजाराम सोनटक्के, आष्टी, जि.बीड || 88

27) १९६० नंतरचे ग्रामीण साहित्य निर्मितीचे आधार व सामाजीक जडण घडण
प्रा. अमोल बबनराव बेरड—प्रा. बाबासाहेब रघुनाथ पंदरकर || 92

28) धग—एक आकलन
नानासाहेब महादेव गव्हाणे, पुणे || 94

29) स्वातंत्र्योत्तर ग्रामीण कविता आणि बदलते संदर्भ
प्रा. माधव मारूती भोसले, नेसरी, ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर || 97

https://sites.google.com/site/vidyawartajournal http://www.vidyawarta.blogspot.com

26

# १९६० नंतरची ग्रामीण कथा

प्रा.डॉ. राजाराम सोनटक्के
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
आष्टी, जि.बीड

***********

मराठीतील पहिली लिखित गोष्ट महानुभावीय परंपरेतील सापडलेली दिसून येते 'लिळाचरित्रां'त ग्राईभटांनी अनेक प्रसंग गोष्टींच्या रुपाने सांगितलेले आहेत. चक्रधरांनी सांगितलेले, दिलेले विविध दृष्टांत म्हणजेच उपदेशपर गोष्टीच आहेत. यापुर्वीही संस्कृत व प्राकृतची कथा परंपरा होतीच.

मराठीतील पहिला आद्यकथा ग्रंथ 'वैजनाथ कलानिधी' हा असून वैजनाथाने यातील गोष्टी १३ व्या शतकात लिहिल्या असाव्यात असे अभ्यासकांचे म्हणने आहे. मराठीतला पहिला मुद्रित कथासंग्रह अर्वाचिन काळात तंजावरकडील सर्फोजी राजे यांनी सरखखन पंडिताकडून तयार करुन घेतला. (बालबोध मुक्तावली १८०६)

ग्राम वास्तवाचा सामाजिक वेध घेतांना तेथील निसर्ग, खेडी, बदलणारी ग्राम संस्कृती, कृषी संस्कृती हे त्यांच्या कथेचे विषय होतात, या संस्कृतीमधली माणूस, त्याचा साधेभोळेपणा, सात्विक वृत्ती, स्वभाव, मानपान, ईर्ष्या, दु:ख, श्रीमंती, प्रतिष्ठा, परंपरा, इनामदार घराणी, रानशिवार, श्रमजीवी कष्टकरी शेतकरी, कृषीतील प्राणी यांचे भावविश्व घेऊन कथा येते, काव्यात्मकता व नाटयात्मकता, हा त्यांचा लेखन शैलीचा विशेष असल्यामूळे कथेतील वास्तव अधिक उत्कट, संवेदनशील व तरल होते. त्यांच्या कथा नाटकासारख्याच जीवनाटयाने भरलेल्या असतात. त्यातील घटना, प्रसंग व्यक्तीचित्रे या सर्वांना नाटयमयतेचे अंग असते.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारतीय समाज जीवनामध्ये अमूलाग्र बदल झाले. स्वातंत्र्य या स्वयंभू व बहुआयामी संकल्पनेचा सर्वसामान्य जीवनावर खोलवर परिणाम झाला. स्वातंत्र्यानंतरचे पाव शतक विविध आशा—आकांक्षांनी सामान्यांसाठीच्या कल्याणप्रद ध्येयधोरणांनी भारलेले दिसून येते. हजारो वर्षापासूनचा दबलेला वंचित शोषित बहुजन वर्ग या काळात विशिष्ट आशेने कार्यरत होतांना दिसून येत आहे. स्वातंत्र्य या बहुपरिमानात्मक मूल्याबरोबरच भारतीय राज्यघटना नेहरु युगाची समाजवादी राजवट, सार्वत्रिक निवडणूका, संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन भाषिक प्रांतरचना, डॉ. बाबासाहेबांचे धर्मांतर, पंचायत राज कृषी औद्योगिक क्षेत्रातील बदल अशा वेगवेगळया सामाजिक राजकीय बाबींचा परिणाम झालेला दिसून येतो.

१९६० नंतर ग्रामीण जीवनात अनेक बदल घडून आले. विविध योजना खेडयापाडयांतून राबविल्या जाऊ लागल्या. राजकारणाचे वारे वाहू लागले. सहकारी संस्थांचे जाळे विणले गेले. तळागाळापर्यंत शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या. शिक्षण घेतलेली बहुजन समाजातील थोडीबहुत पिढी आपल्या जगण्याचा चिंतनशील विचार करु लागली. साहित्यातून आत्मशोध घेऊ लागली. यातूनच ग्रामीण, दलित, जनवादी असे प्रवाह पुष्ट होऊ लागले. १९४०—४५ नंतर तर खेडी जीवनाचा वेध घेत साहित्यपटावर येत होतीच. माडगूळकर मिरासदार आणि पाटील यांनी तिची पाऊलवाट गडद केली होती. यानंतर येणाऱ्या साहित्यिकांवरील या लेखकत्रयींचा प्रभाव बघितला म्हणजे त्यांच्या कथेच्या सामर्थ्याची प्रचीती येते. पुढील पिढी, बदललेली खेडी आणि तेथील जीवनमान यांचा शोध घेऊ लागली.

१९६० नंतरच्या काळातील रा. रं. बोराडे हे महत्वाचे कथाकार आहेत. १९५७ मध्ये त्यांनी कथालेखनास प्रारंभ केला असला तरी त्यांचा 'पेरणी' हा कथा संग्रह १९६२ मध्ये प्रकाशित झाला. मराठवाडयाच्या अस्सल मातीची ग्रामीण कथा त्यांनी लिहिली. आपल्या प्रतिभेचा शोध लेखक वेगवेगळया साहित्यप्रकारामधून घेऊन अभिव्यक्तीचे समाधान

मिळविण्याचा यत्न करतो. कारण त्याच्या आतील सांगणे जोपर्यन्त समाधानकारक होत नाही तोपर्यंत तो बेचैन व अस्वस्थ असतो. असाच आपल्या प्रतिभेचा शोध बोराडे कथा, कादंबरी, नाटिका, बालसाहित्य या साहित्य प्रकारामधून घेतात आणि कथेमध्ये ते रमतात. त्यांचे 'पेरणी' 'मळणी' 'वानवळा' इत्यादी कथासंग्रह प्रकाशित आहेत. कथासंग्रहाच्या केवळ नावावरुन ग्रामीण आशयाचा बोध झाल्याशिवाय राहत नाही.

आनंद यादव यांनी १९६३ पासून कथालेखनास सुरुवात केलेली आहे. त्यांचा मूळपिंड कवीचा असून कथेपुर्वी त्यांनी अनेक कविता लिहिल्या आहेत. ही काव्यात्मवृत्ती त्यांच्या कथेतूनही दिसून येते. शंकर पाटलांच्या कथेचा प्रभाव त्यांच्या कथालेखनावर दिसून येतो. यादव यांनी ग्रामीण जीवनाच्या अंतरंगात शिरुन कथेला मुक्तपणे अभिव्यक्त होऊ दिले. 'मातीखालची माती' ते 'उखडलेली झाडे' या कथासंग्रहातून हे दिसून येते.

शंकर पाटलांच्या मनोविश्लेषणात्मक कथेचे अधिक कलात्मक पुढचे रुप म्हणजे सखा कलालांची कथा होय. ग्रामीण निसर्ग, परिसर, बोलीभाषा यांचा उपयोग ते कथालेखनासाठी करतात. घटना—प्रसंगापेक्षा त्यांची कथा मानवी मनाचा ठाव घेते. मन: पातळीवरील विविध वलये ती उलगडत जाते. 'बळी' मधून एका फसलेल्या कुमारिकेची कथा अत्यंत संयमाने व उत्कटतेने त्यांनी रेखाटली आहे. ग्रामीण जीवनातील दु:ख सोशिकता यांचे संवेदनशील चित्रन त्यांनी कथेमधून केले आहे.

चारुता सागर हे एक महत्वाचे कथाकार आहेत. त्यांच्या कथेने मराठी कथेला समृध्द केले आहे. सागर यांनी मोजक्याच कथा लिहिल्या. पण त्या त्यांच्या लेखनाचे सामर्थ्य दाखवणाऱ्या आहेत. 'नागीण' ही कथा त्यांच्या प्रतिभेचे सामर्थ्य दाखविते. ती चारुता सागर यांना समजून घेण्यासाठी मुळातून पहाणे आवश्यक आहे.

महादेव मोरे यांनी ग्रामीण परिघाबाहेरचे जग कथेमधून मांडले आहे. डोंबारी, कोल्हाटी, जोगतिनी वेश्या, मेहतर, मेश्री, हमाल, व्यापारी क्लीनर, ड्रायव्हर अशांचे जीवनविश्व त्यांनी शब्दबध्द केले आहे. तंबाखूच्या वखारीतील कामगार स्त्री—पुरुषांच्या फसवणुकीचे व अडवणूकीचे दर्शनही त्यांनी घडवले आहे. काहीशा भडक व उत्तान शृंगाराच्या रेखाटनामूळे त्यांची कथा संयमाचे उल्लंघन करतांना दिसते. बोलीभाषेच्या उपयोजनामूळे आणि परिघाबाहेरच्या जगाचे भाव विश्व रेखाटल्यामूळे त्यांची कथा त्या परिसराच्या सांस्कृतिक परिघाचा दरवळ मराठी कथेत घेऊन येते.

चंद्रकांत भालेराव यांनी रझाकारी राजवटीतील जीवनाचे दर्शन घडवले आहे. त्यांचा 'वाहटूळ' हा कथासंग्रह १९६४ मध्ये प्रकाशित झाला. त्यानंतर त्यांचे 'झमेला' 'निचरा' हे कथासंग्रह आले निजामी राजवट, तिचे प्रशासन, जातीसंघर्ष रझाकारी चळवळ पोलीस अॅक्सन यांचे चित्रण त्यांची कथा करते. सामाजिक जीवनाच्या चित्रणाबरोबरच त्यांनी विनोदी कथालेखनही केले. विसंगती आणि मिस्किलता आणि विनोद त्यांच्या कथेत दिसून येतो.

नां. धो. महानोर यांनीही काही ग्रामीण कथा लिहिल्या आहेत. त्यामध्ये निजामी राजवटीत चांगल्या माणसांची ससेहोलपट कशी होते याचे चित्रण 'भुताटकी' मधून येते. द. ता. भोसले यांचे 'अच', 'पाळत', 'अगं अगं म्हशी', 'पाऊस', हे कथासंग्रह ग्रामीण स्थित्यंतराची दखल घेतात. नागनाथ कोत्तापल्ले हे ग्रामीण साहित्य चळवळीला तात्विक अधिष्ठान देऊ पाहणारे या चळवळीची सैध्दांतिक मांडणी करुन तिची निट ऐतिहासिक परंपरा पुढची वाटचाल करु पाहणारे आणि 'चळवळीचे साहित्यशास्त्र' मांडू पाहणारे एक महत्त्वाचे लेखक आहेत. वैचारिक—समीक्षात्मक लेखना बरोबरच त्यांनी केलेले कथालेखन ग्रामीणत्वाच्या दृष्टीने अतिशय महत्वपूर्ण असे आहे. ग्रामीण कथेत आपली स्वतंत्र पायवाट निर्माण करणारे लक्षवेधी कथाकार म्हणून अण्णाभाऊ साठे यांच्यानंतर शंकरराव खरात यांनी ग्रामीण जीवनातील उपेक्षितांची अस्पर्शीत अशा माणसांची दु:खे मांडली आहेत. 'बारा बलुतेदार', 'तडीपार', 'दौडी', 'सांगावा', 'गावशीव', 'टिटवीया फेरा', यासारख्या त्यांच्या कथासंग्रहातून दलित

जीवनातील दुःखभोग अधोरेखित झाला आहे. ग्रामीण जीवनातील जातीयतेमूळे होणारी आर्थिक–सामाजिक कोंडी, वाटयाला आलेली माणखंडना यातील बहुतांश कथातून खरात प्रकट करतात. यासंदर्भात वासुदेव मुलाटे म्हणतात, "खरातांच्या कथेतील विषय आणि विविध प्रकारची माणसे, त्यांच्या वागण्या बोलण्याच्या अनुभवाच्या तऱ्हा बघितल्या तर लक्षात येते की, खरातांचे अनुभव क्षेत्र अत्यंत व्यापक आहे. नुसत्या वेशीबाहेरील लोकांच्या वेदनाच नाहीत, तर ज्यांना गावच नाही अशा उपऱ्यांच्या जीवनातील व्यथावेदना, त्यांची जीवनपध्दती, त्यातील भयान वास्तव, रखरख दैना व परवड यांचे व्यापक व विस्तृत दर्शन त्यांच्या कथेतून येते." (मुलाटे–२०१२ पृ.७६) शंकरराव खरातांनी मराठी कथेचे क्षेत्र व्यापक बनवले, परंतु त्यांची कथादेखील दलित व ग्रामीण चळवळीच्या मूळ हेतूपासून काहीशी अंतरावरच राहिलेली दिसून येते. ग्रामीण साहित्यात स्त्री लेखिकांचे प्रमाण अल्प असले तरी प्रतिमा इंगोले यांनी अन्य वाड. मयाबरोबरच कथा हा वाङमयप्रकार प्राधान्याने हाताळला आहे. 'हजारी बेलपान', 'अकसिदीचे दाणे', 'सुगरणीचा खोपा', 'जावयाच पोरं', 'लेक मुईची', अशा काही कथा संग्रहामधून वऱ्हाडी ग्रामजीवन आणि वैदर्भीय बोली आणि तेथील संस्कृती यांचे सम्यक दर्शन घडवले आहे. स्त्रीजीवनातील सुख–दुःखे पितृ सत्ताकतेने स्त्रियांसंदर्भात घेतलेले वेग–वेगळे पवित्रे, ग्राम जीवनातील स्त्रियांची सोशिकता ग्रामीण माणसांची परंपरा शरणता अशा काही आशयसूत्रांना कवेत घेऊन प्रतिमा इंगोले यांची कथा पुढे जाते. त्यांच्या कथांच्या संदर्भात एकनाथ सागर म्हणतात, "खेडयांच्या ओसाडपणा मागील शहरी आकर्षण आणि पैशाची हाव याचा शोध त्या घेऊ पाहतात' मात्र असे करतांना ग्रामजीवनातील ऐकीव गोष्टी, किस्से सांगावेत असे कथनरुप घडवतात. रंगवून सांगण्याला त्यामूळे महत्त्व येते की काय? अशी शंकाही येते. ग्रामजीवनातील बेरकीपणा, लहानमोठया कृतीमागील स्वार्थीपणा, भोंदूपणा, अडेलतटटूपणा यांना हास्यास्पद वाटणाऱ्या कथन रुपाचे प्रमाण मात्र अधिक दिसते.... समाजजीवनातील लोकजीवनातील वास्तव रंगवून सांगण्यात या कथांचे वेगळेपण लक्षात येते." (पगार एकनाथ, म.सा.प. खंड ७, २०१०, पृ. ४६३) तसेच वासुदेव मुलाटे यांची ग्रामीण साहित्य चळवळ, ग्रामीण साहित्य संमेलने आणि ग्रामीण साहित्य निर्मिती यासंदर्भात महत्त्वाचे योगदान राहिलेले आहे. ग्रामीण कथेची आशयानुयायी समीक्षा 'ग्रामीण कथा', 'स्वरुप व विकास' या ग्रंथाद्वारे सिध्द केली आहे. वासुदेव मुलाटे यांनी 'काळोखवेणा', 'व्यथाफूल', 'ॲबॉर्शन', 'अंधार रंग', या कथासंग्रहातून ग्रामीण माणसांचे ग्रामीण जीवनातील जातीयतेचे, कर्जबाजारी शेतकऱ्यांचे, शोषणाचे विविध संदर्भ अधोरेखित केलेले आहेत.

अगदी अलीकडच्या काळात सतीश तरास उत्तम बावस्कर, सदानंद देशमूख, बाबाराव मुसळे, आनंद पाटील, योगिराज वाघमारे, सोपान हाळमकर, बाबा पाटील, श्रीराम गुंदेकर, शंकर सखाराम अशा काही कथालेखकांनी आपल्या कथालेखनाद्वारे ग्रामीण कथा विश्व समृध्द केले आहे. या लेखकांना नव्या बदलत्या युगाचे भान आलेले आहे. आणि ग्रामीणत्वाची नसदेखील सापडलेली आहे. अशा साहित्य लेखकांच्या संदर्भात नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, "नव्या जीवन जाणीवांच्या प्रकाशात ग्रामीण जीवनाचा अन्वयार्थ लावून ग्रामीण जीवनातील दुःख दारिद्र्याला परिणामकारकरित्या प्रकट करण्याचा प्रयत्न हे लेखक करत आहेत. वैचारिक संचित तपासून पाहण्याची गरज या लेखकांना वाटू लागली आहे. ग्रामीण कथेला जो खोडा पडलेला होता त्यातून ग्रामीण कथा मुक्त होण्याची सुचिन्हे दिसू लागलेली आहेत." (कोत्तापल्ले नागनाथ १९८६, पृ. १९४) मनोहर तल्हार यांची कथा ग्रामवास्तवावर गंभीर भाष्य करते. 'कॅन्सल' या कथासंग्रहातून निसर्गाच्या गावातील अपप्रवृत्तीच्या दुष्टचक्रात अडकलेल्या सामान्य शेतक–यांचे भोवतालच्या अनेक घटकाकडून होणारे शोषण, जगण्यासाठी सुरु असणारी आणि कधीही न संपणारी विवंचना आदी घटकांना तलहारांची कथा नेमकेपणाने स्पर्श करते,

राजन गवस यांनी कृषीजन परंपरेचा क्रमशः होत जाणारा ऱ्हास त्यांची कथा तटस्थपणाने रेखाटते. 'रिवणावायली मुंगी' आणि 'आपण माणसात जमा नाही' या दोन कथासंग्रहातून कृषी परंपरेचा, ग्रामीण जीवन व्यवस्थेचा वेध घेतलेला आहे.

बाबाराव मुसळे यांचा 'मोहरलेला चंद्र' हा कथासंग्रह ग्रामीण जीवनाच्या बदलत्या विश्वाची शोकांतिका आपणासमोर मांडतो. सदानंद देशमूख यांच्या कथा शेतकऱ्यांचे संघर्षमय जीवन त्यांच्या वाटयाला आलेले दु:ख, निसर्गाकडून सामाजिक व्यवस्थेकडून त्यांच्या जगण्याची झालेली वाताहात याचे चित्रण मांडतात. रविंद्र शोभणे यांच्या 'दाहीदिशा' या कथासंग्रहातून ग्रामवास्तवाचे सूक्ष्म चित्रण येते. ललिता गादगे, शैलजा गावडे, मथू सावंत, आदि ग्रामीण स्त्रीकथाकारांच्या कथेतून ग्रामीण स्त्रीजीवनातील अनुभवांचे सुक्ष्म स्तर प्रभावीपणे चित्रित झालेले आहेत. उत्तम बावस्कर यांच्या 'इस्कोट' कथासंग्रहातून शैक्षणिक वर्तुळातून ग्रामीण युवकांचे केले जाणारे शोषण प्रामूख्याने चित्रित झालेले आहे. दशरथ चौरे यांनी ग्रामीण भागातील राजकारण त्या राजकारणातून नियमितपणे केले जाणारे शोषण हे 'गावकुसाबाहेरील माणस' या कथासंग्रहात केले आहे. महेंद्र कदम यांच्या 'तो भितो त्याची गोष्ट' या कथासंग्रहातून ग्रामीण परिसर, कृषी व्यवस्थेची, नातेसंबंधाची बदलती रुपे यांचे वर्णन केलेले दिसते. सतीश तराळ, अशोक कोठी, कृष्णात खोत, अनुराधा गुरव, विलास अंभोरे, तानाजी पाटील, गणेश आवटी, विलास सिंदणीकर, शिवाजी मुंढे, प्रकाश खरात, नवनीत देशमूख, उत्तरा हुदार, सुरेश आकोटकर, दे.शि.दुधळकर, संतोष मुणवकर, अशोक मानकर, आनंद भोयरे, नागनाथ पाटील, प्रभाकर हरकळ, भीमराव वाक्चौरे, शंकर सखाराम, बसवराज पाटील, अर्जून व्हटकर, राजेंद्र भोसले, सुरेंद्र पाटील, विजयकुमार मिठे, भारत काळे अशा कितीतरी कथालेखकांनी ग्रामीण जीवनातील वेदना, विद्रोहाची नवसंस्कृतीला स्वत:चा आवाज मिळवून देण्याचा अत्यंत मूलगामी प्रयत्न केला. ज्यामूळे एकोणीसशे साठ नंतरच्या कथावाङ्मयात ग्रामीण कथेला स्वत:च्या अस्तित्वाची खूण जिवंत ठेवता आली. जवळजवळ सर्वच कथाकारांच्या कथेतून ग्रामस्तरावरील कोसळत्या गावगाडयाचे विदारक दर्शन घडवते. पावसाच्या अनियमितपणे वाढत्या नापिकीला तोंड कसे द्यायचे? हाताला काम नसल्यामूळे रिकाम्या वेळेचा अवकाश कसा भरुन काढायचा? यासारख्या विविध प्रश्नांनी त्रस्त ग्रामीण माणसांच्या भावविश्वाचे दर्शन या कथाकारांच्या कथेतून घडते.

**संदर्भ:—**

१) मुलाटे वासुदेव, ग्रामीण कथा: स्वरुप आणि विकास, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, दु. आ. २००५
२) भोसले द.ता., ग्रामीण कथा, मराठी कथा, परंपरा आणि नवता, बेढंखळे अशोक (संपा) मराठी साहित्य महामंडळ, मुंबई, प्रका प.आ. २०१०
३) मुलाटे वासुदेव, जागतीकरणाचा मराठी भाषेवर प्रभाव प्रशांत पब्लीकेशन्स, जळगांव प. आ. २०१४
४) इंगोले प्रतिमा, साहित्यातील बदलती ग्रामीण स्त्री, ग्रामीण साहित्य आणि वास्तव, इंगोले कृष्णा (संपा) स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, प.आ. २०११
५) गुहा रामचंद्र गांधी नंतरचा भारत, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस मुंबई, तृतीय आवृत्ती, २०१५
६) ललित कथा विशेषांक, ऑगष्ट २०१३, अतिथि संपादक, पुष्पलता राजापूरे—तापस.
७) नलगे चंद्रकुमार, ग्रामीण वाङमयाचा इतिहास, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर—२०१३.

❑❑❑

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

कुकडी एज्युकेशन सोसायटीचे

# सावित्रीबाई कला महाविद्यालय

पिंपळगांव पिसा, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर, ४१३७०३.

**नॅक मुल्यांकित ''सी'' दर्जा प्राप्त**

## विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली (यु.जी.सी.) यांच्या संयुक्त विद्यमाने

**मराठी विभाग आयोजित**

# १९६० नंतरचे ग्रामीण साहित्य

# ॥ प्रमाणपत्र ॥

प्रमाणित करण्यात येते की, प्रा./डॉ./श्री./श्रीमती सोनटक्के राजाराम तुकाराम

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आष्टी यांनी दि. ३ व ४ जानेवारी २०१७

रोजी **१९६० नंतरचे ग्रामीण साहित्य** या विषयावर आयोजित व्दि-दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्रात सक्रिय सहभाग घेतला आणि

१९६० नंतरची ग्रामीण कथा या विषयावर प्रमुख पाहुणे/मार्गदर्शक/प्राध्यापक/विद्यार्थी म्हणून शोधनिबंध

सादर केला/मार्गदर्शन केले त्याबद्दल त्यांना हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

* समन्वयक *

**प्रा.डॉ.देविदास शेटे**

मराठी विभाग प्रमुख, सावित्रीबाई कला महाविद्यालय, पिं.पिसा, ता.श्रीगोंदा, जि.अ.नगर

* प्राचार्य *

**शांतीलाल घेगडे**

सावित्रीबाई कला महाविद्यालय, पिं.पिसा, ता.श्रीगोंदा, जि.अ.नगर


डॉ. शरद व्यवहारे :
व्यक्ती आणि वाङ्मय
डॉ. राजाराम सोनटक्के

# डॉ. शरद व्यवहारे : व्यक्ती आणि वाङ्मय

डॉ. राजाराम सोनटक्के
मराठी विभागप्रमुख
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
आष्टी, जि. बीड – ४१४२०३

म. गांधी एज्युकेशन अँड वेलफेअर सोसायटी
www.mgsociety.in

ISBN: 978-81-934540-3-9

- डॉ. शरद व्यवहारे : व्यक्ती आणि वाङ्मय
- लेखक: डॉ. राजाराम सोनटक्के
- प्रथम आवृत्ती : १५ ऑगस्ट २०१७

© लेखक

All rights reserved. No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means without written permission of the copyright owner.

- **प्रकाशक :**

महात्मा गांधी एज्युकेशन अंड वेलफेअर सोसायटी,
नरवाडी, जि. परभणी
आणि
न्यू मॅन पब्लिकेशन, परभणी
Mob. + 91 9730721393,
Email: nmpublication@gmail.com
www.newmanpublication.com

- **मुद्रक:**

स्नेहल प्रिंटर्स,
माळी गल्ली, स्टेडीअम जवळ, परभणी -४३१४०१
Mob. + 91 8329000732

- **मुखपृष्ठ :**

सीमा झाडे, मो.+91 9420079975

- **अक्षर जुळवणी :**

डॉ कल्याण गांगर्डे .

- **किंमत : ४००/- रु.**



निरक्षर असलेली माझी आई
गं.भा. द्रोपदाबाई व वडील
कै. तुकाराम सोनटक्के यांना..

17-18

नॅक पुनर्मूल्यांकित 'A' ग्रेड

# पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर

(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित)

व

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

एप्रिल २०१८

2017-2018

पॉवर ऑफ नॉलेज

विशेषांक

एप्रिल २०१८

ISSN-2320-4494

UGC approved

Sr.No. 45681

# संशोधनाच्या नव्या दिशा

संपादक

**डॉ. माहेश्वरी गावित**

# संशोधनाच्या नव्या दिशा

मुख्य संपादक

डॉ. माहेश्वरी गावित

समन्वयक

मराठी संशोधन केंद्र

प्रकाशक

पॉवर ऑफ नॉलेज

## अनुक्रमणिका


१) संशोधन : स्वरूप आणि दिशा / १५
- प्राचार्य डॉ. महेंद्र कदम

२) मराठी भाषा व साहित्य संशोधनाच्या दिशा / २४
- प्रा.डॉ. मीनाक्षी देव

३) मराठीतील मध्ययुगीन साहित्यनिर्मिती केंद्र : एक आंतर्विद्याक्षेत्रीय परिप्रेक्ष्य / ३१
- प्रा.डॉ. शिरीष लांडगे

४) आंतर्विद्याशाखीय अभ्यास आणि साहित्य / ४१
- डॉ. जी. वाय शिखरे

५) आंतर्विद्याशाखीय संशोधन व राज्यशास्त्रीय संशोधनाची दिशा / ४८
- प्रा.डॉ. विलास बनसोडे

६) आंतर्विद्याक्षेत्रीय संशोधन / ५३
- प्रा.डॉ. निलेश खरात

७) अनुवाद : संकल्पना आणि स्वरूप / ५७
- प्रा.डॉ. संदीप सांगळे

८) तौलनिक साहित्याभ्यास : संकल्पना आणि शोध / ६२
- प्रा.डॉ. शारदा मोरे

९) तौलनिक साहित्याभ्यास / ६९
- शांताराम चौधरी

१०) तौलनिक साहित्याभ्यासाची दिशा / ७८
- प्रा.डॉ. गोपीनाथ बोडखे

११) तौलनिक आणि तुलनात्मक साहित्याभ्यास / ८२
- प्रा. संगीता रसाळ

१२) ग्रामीण आणि दलित साहित्यप्रवाहांचा तौलनिक अभ्यास / ८९
- प्रा.डॉ. सुनील निगडे

१३) दलित ग्रामीण साहित्यप्रवाहांचा तौलनिक अभ्यासक / ९५
- प्रा.डॉ. अशोक डोळस

१४) दलित-दलितेतर कादंबरी : एक तुलनात्मक अभ्यास / १०२
- नवनाथ रक्टे

१५) मराठी आणि हिंदी दलित आत्मकथने वास्तव आणि कल्पना : एक तौलनिक निष्कर्ष / १०७
– प्रा.डॉ. प्रकाश जाधव
१६) काव्य समीक्षा संशोधन : काही सूत्रे / ११३
– डॉ. सुधाकर शेलार
१७) साहित्य प्रकारनिष्ठ समीक्षा / ११९
– प्रा.डॉ. विजया पाटील
१८) वैचारिक साहित्य : संशोधनाच्या नव्या दिशा / १२५
– कु. सारिका पाचरणे
१९) मराठीतील बालकादंबरीचे स्वरूप (सन १९९० ते २०१०) / १३१
– संतोषकुमार राठोड
२०) लोकसाहित्यविषयक संशोधन / १३६
– प्रा.डॉ. विजय पाटील
२१) लोकसाहित्यातील क्षेत्रीय संशोधन / १४२
– प्रा.डॉ. सुभाष शेकडे
२२) लोकसाहित्यातील 'स्त्रियांच्या जात्यावरील' ओव्या / १५५
– प्रा. विक्रम कांबळे
२३) सोंग लोककलेची प्रयोजने : स्वरूप परंपरा / १६१
– प्रा.डॉ. ज्योती माने
२४) लोकसाहित्यातील लोककलांचे संशोधन : बहुरुपी / १७१
– प्रा. रामदास कातकडे
२५) आदिवासी कणसरी कथांची कथनमीमांसा / १७९
– डॉ. अंजली मस्करेन्हस
२६) लोकसाहित्यविषयक संशोधन / १८७
– डॉ. वि. दा. म्हस्के
२७) लोकसाहित्याचे स्वरूप / १९३
– प्रणाली पोकळे
२८) लोकसाहित्यविषयक संशोधन / १९९
– संजय भुतांबरे
२९) विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यांचे संशोधन : आवश्यकता व पद्धती / २०३
– प्रा.डॉ. वृंदा देशपांडे-जोशी
३०) शैलीवैज्ञानिक संशोधन / २११
– डॉ. सविता खोकले
३१) आदिवासी भाषांचे संशोधन / २१५
– प्रा.डॉ. माहेश्वरी गावित
३२) खान्देशातील वडार बोली – जतन आणि संवर्धन / २२१
– प्रा.डॉ. माधव कदम
३३) भाषिक संशोधन / २३०
– महेश कुलकर्णी
३४) साहित्य आणि सौंदर्यशास्त्र यांचा परस्परसंबंध / २३४
– प्रा.डॉ. चंद्रकांत काळे
३५) साहित्य व विज्ञान यांचा परस्परसंबंध / २३९
– प्रा.डॉ. बबनराव टिळेकर
३६) साहित्य आणि विज्ञान / २४३
– प्रा.डॉ. जालिंदर कानडे
३७) साहित्य आणि संस्कृती / २५०
– प्रा.डॉ. राजाराम सोनटक्के
३८) साहित्य आणि तत्त्वज्ञान / २५४
– डॉ. सुभाष देशमुख
३९) स्त्रीवादी समीक्षा : एक अवलोकन / २६१
– श्रीमती मंदा हाडवळे
४०) संशोधनपद्धती / २६४
– अमर तांबे
४१) संशोधनाची लेखनपद्धती / २७३
– गौतम जाधव
४२) संशोधनपद्धती / २८१
– रामदास टेकाळे
४३) संशोधनपद्धती / २८५
– दिप्ती ठाकर
४४) संहिता चिकित्सा (पाठसंशोधन) / २९२
– प्रा.डॉ. मच्छिंद्र मालुंजकर
४५) संहितानिश्चिती / ३०४
– ऋता ठाकूर

[illegible] आत्मकथन वास्तव आणि कल्पना
ानिक निष्कर्ष / १०७
प्रकाश जाधव
मीक्षा संशोधन : काही सूत्रे / ११३
ुधाकर शेलार
प्रकारनिष्ठ समीक्षा / ११९
. विजया पाटील
साहित्य : संशोधनाच्या नव्या दिशा / १२५
ारिका पाचरणे
ल बालकादंबरीचे स्वरूप (सन १९९० ते २०१०) / १३१
कुमार राठोड
हेत्यविषयक संशोधन / १३६
. विजय पाटील
हेत्यातील क्षेत्रीय संशोधन / १४२
. सुभाष शेकडे
हेत्यातील 'स्त्रियांच्या जात्यावरील' ओव्या / १५५
क्रम कांबळे
कक. ा प्रयोजने : स्वरूप परंपरा / १६१
. ज्योती माने
हेत्यातील लोककलांचे संशोधन : बहुरुपी / १७१
मदास कातकडे
ी कणसरी कथांची कथनमीमांसा / १७९
ंजली मस्करेन्हस
हेत्यविषयक संशोधन / १८७
. दा. म्हस्के
हेत्याचे स्वरूप / १९३
ी पोकळे
हेत्यविषयक संशोधन / १९९
भुतांबरे
व्या भाषिक कौशल्यांचे संशोधन :
ता व पद्धती / २०३
वृंदा देशपांडे-जोशी

३०) [illegible] संशोधन / [illegible]
– डॉ. सविता खोकले
३१) आदिवासी भाषांचे संशोधन / २१५
– प्रा.डॉ. माहेश्वरी गावित
३२) खान्देशातील वडार बोली - जतन आणि संवर्धन / २२६
– प्रा.डॉ. माधव कदम
३३) भाषिक संशोधन / २३०
– महेश कुलकर्णी
३४) साहित्य आणि सौंदर्यशास्त्र यांचा परस्परसंबंध / २३४
– प्रा.डॉ. चंद्रकांत काळे
३५) साहित्य व विज्ञान यांचा परस्परसंबंध / २३९
– प्रा.डॉ. बबनराव टिळेकर
३६) साहित्य आणि विज्ञान / २४३
– प्रा.डॉ. जालिंदर कानडे
३७) साहित्य आणि संस्कृती / २५०
– प्रा.डॉ. राजाराम सोनटक्के
३८) साहित्य आणि तत्त्वज्ञान / २५४
– डॉ. सुभाष देशमुख
३९) स्त्रीवादी समीक्षा : एक अवलोकन / २६१
– श्रीमती मंदा हाडवळे
४०) संशोधनपद्धती / २६४
– अमर तांबे
४१) संशोधनाची लेखनपद्धती / २७३
– गौतम जाधव
४२) संशोधनपद्धती / २८१
– रामदास टेकाळे
४३) संशोधनपद्धती / २८५
– दिप्ती ठाकर
४४) संहिता चिकित्सा (पाठसंशोधन) / २९२
– प्रा.डॉ. मच्छिंद्र मालुंजकर
४५) संहितानिश्चिती / ३०४
– ऋता ठाकूर

# साहित्य आणि संस्कृती

– प्रा.डॉ. राजाराम सोनटक्के,
(अभ्यास मंडळ सदस्य)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

संस्कृती सम. + कृ या धातूपासून तयार झालेला शब्द. इंग्रजीत यालाच 'कल्चर' असे म्हटले जाते. माणूस आणि इतर प्राणी यांच्यातील वेगळेपण सिद्ध करणारा शब्द म्हणजे 'संस्कृती' होय. संस्कृती या शब्दात अनेक विचारवंतांचे एकमत झाले आहे, असे दिसून येत नाही. मात्र व्यक्ती आणि समूह यांच्यामधील परस्परसंबंधीचा व्यवहार कसा चालतो याची नोंद आपण घेऊ शकतो. संस्काराने ज्याची सिद्धी झालेली असते तिला संस्कृती असे म्हणता येईल. संस्कारातून संस्कृती सिद्ध होते. याविषयी डॉ. सुधीर रसाळ म्हणतात, ''विशिष्ट भूभागावर सातत्याने राहणारा मानवसमूह त्या भूभागाच्या प्राकृतिक गुणधर्मावर आधारित अशी संस्कृती निर्माण करतो.'' संस्कृती शब्दाचा अर्थ सांगण्याचा प्रयत्न अनेक विचारवंतांनी केला आहे. प्रा. द. के. केळकर म्हणतात, ''संस्कृती या शब्दाइतका व्यापक अर्थबोधक शब्द क्वचितच असेल. या शब्दाने कोणत्याही समाजाच्या आचार, विचार, व्यवहारांचे, त्यांच्या आर्थिक व्यापारांचे, त्याच्या शास्त्र व कला यांच्या उपासनेने त्यांच्या समाजधारणेने प्रवर्तिक केलेल्या धर्माप्रती व कायदेकानून यांचे व त्याच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचे, अशा सर्व अंगोपांगाचे एक समवायच्छेदन करून दिग्दर्शन होते. कोणत्याही वस्तूवर व्यक्तिमत्त्वाचा संस्कार वठविणे यात मानवाचे मानव्य साठलेले आहे.''

साहित्य हा मानवी जीवनातील महत्त्वपूर्ण सांस्कृतिक उपक्रम आहे. कारण साहित्य हे समाज व संस्कृती यांचे रूप अभिव्यक्त करते. विविध घटकांनी प्रभावित झालेले व्यक्तिमन व समूहमन, त्यातून प्रकट झालेले समूहमानस यांच्यामधील परंपरा, प्रेरणा व प्रवृत्ती यांचे प्रकटन साहित्य करीत असते. प्रा. ग.



ग. जाधव म्हणतात, ''भाषा हे साहित्याचे माध्यम :
घटक. यामुळे संस्कृतिनिरपेक्ष अशी साहित्यकृती
साहित्य आणि संस्कृती यांचा परस्पर संबंध स
विचार अभिप्रेत असतो. संस्कृतीचा संबंध व
पाहावयास मिळतो. आपल्या दैनंदिन जीवनास सु
यंत्रे, अस्त्रे मानवाने निर्माण केली. निर्मितीत त्य
कौशल्य अधिकाधिक प्रगत करून वापरले. त्यातून
बदलत गेली. याच वास्तवाधिष्ठित सामग्रीचा उप
निर्माण करताना केला जातो. त्यामुळे साहित्यातील
भौतिक सृष्टीशी येतो. या अर्थाने साहित्य आ
संस्कृती यांचा अतूट संबंध आहे.

संस्कृती, ज्ञान, श्रद्धा व कौशल्ये आदींच्या
काही जीवनमूल्ये प्रदान करीत असते. त्यामुळे सं
अधिक परिष्कृत करते. याचाच अर्थ असा की, म
सामर्थ्य देण्याचे महत्त्वपूर्ण काम संस्कृतीच करीत
सामर्थ्य आणि निष्ठा समाजजीवनापासून प्राप्त होते.
आणि लिखित भाषिक स्वरूपात चालणारे सा
निर्मिलेल्या अनेकविध तपाने, कौशल्याने, मूल्याने
सामर्थ्यातून आणि निष्ठेतून साहित्याला सामर्थ्य मि
लोकांच्या मनावर आणि अंत:करणावर प्रभाव निमि
साहित्यही करीत असते. आजही ग्रामीण भागात
लोकगीते, शाहिरी कविता यांची अभिरुची अधिक
समाजमाणसामध्ये असणाऱ्या संस्कृतीत आहे.
यांच्यामधील संबंध असा आहे.

कोणत्याही समाजामध्ये एखादा नवीन विचार
तो त्या समाजाच्या सांस्कृतिक विभिन्न स्तरावर स्व
एखाद्या समाजाच्या संस्कृतीबरोबर केलेल्या आदाना-
वारसा दुसऱ्या संस्कृतीमध्ये संक्रमित होतानाही
समाजाच्या संस्कृतीचे वेगळेपण त्या संस्कृतीच्या
संस्कृती परिवर्तनीय असली तरी त्याचे मूळ अस्ति
संस्कृती ही समाजनिर्मित जीवनपद्धती वा जगण्या
असते. या जीवनपद्धतीत पोषक अशा अनेक तत्त्व

# साहित्य आणि संस्कृती

– प्रा.डॉ. राजाराम सोनटक्के,
(अभ्यास मंडळ सदस्य)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

संस्कृती सम. + कृ या धातूपासून तयार झालेला शब्द. इंग्रजीत यालाच 'कल्चर' असे म्हटले जाते. माणूस आणि इतर प्राणी यांच्यातील वेगळेपण सिद्ध करणारा शब्द म्हणजे 'संस्कृती' होय. संस्कृती या शब्दात अनेक विचारवंतांचे एकमत झाले आहे, असे दिसून येत नाही, मात्र व्यक्ती आणि समूह यांच्यामधील परस्परसंबंधीचा व्यवहार कसा चालतो याची नोंद आपण घेऊ शकतो. संस्काराने ज्याची सिद्धी झालेली असते तिला संस्कृती असे म्हणता येईल. संस्कारातून संस्कृती सिद्ध होते. याविषयी डॉ. सुधीर रसाळ म्हणतात, ''विशिष्ट भूभागावर सातत्याने राहणारा मानवसमूह त्या भूभागाच्या प्राकृतिक गुणधर्मावर आधारित अशी संस्कृती निर्माण करतो.'' संस्कृती शब्दाचा अर्थ सांगण्याचा प्रयत्न अनेक विचारवंतांनी केला आहे. प्रा. द. के. केळकर म्हणतात, ''संस्कृती या शब्दाइतका व्यापक अर्थबोधक शब्द क्वचितच असेल. या शब्दाने कोणत्याही समाजाच्या आचार, विचार, व्यवहारांचे, त्यांच्या आर्थिक व्यापारांचे, त्याच्या शास्त्र व कला यांच्या उपासनेने त्यांच्या समाजधारणेने प्रवर्तिक केलेल्या धर्माप्रती व कायदेकानून यांचे व त्याच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचे, अशा सर्व अंगोपांगाचे एक समवायच्छेदन करून दिग्दर्शन होते. कोणत्याही वस्तूवर व्यक्तिमत्त्वाचा संस्कार वठविणे यात मानवाचे मानव्य साठलेले आहे.''

साहित्य हा मानवी जीवनातील महत्त्वपूर्ण सांस्कृतिक उपक्रम आहे. कारण साहित्य हे समाज व संस्कृती यांचे रूप अभिव्यक्त करते. विविध घटकांनी प्रभावित झालेले व्यक्तिमन व समूहमन, त्यातून प्रकट झालेले समूहमानस यांच्यामधील परंपरा, प्रेरणा व प्रवृत्ती यांचे प्रकटन साहित्य करीत असते. प्रा. रा.



ग. जाधव म्हणतात, ''भाषा हे साहित्याचे माध्यम
घटक. यामुळे संस्कृतिनिरपेक्ष अशी साहित्यकृती

साहित्य आणि संस्कृती यांचा परस्पर संबंध ए
विचार अभिप्रेत असतो. संस्कृतीचा संबंध व
पाहावयास मिळतो. आपल्या दैनंदिन जीवनास सु
यंत्रे, अस्त्रे मानवाने निर्माण केली. निर्मितीत त्य
कौशल्य अधिकाधिक प्रगत करून वापरले. त्यातून
बदलत गेली. याच वास्तवाधिष्ठित सामग्रीचा उप
निर्माण करताना केला जातो. त्यामुळे साहित्यातील
भौतिक सृष्टीशी येतो. या अर्थाने साहित्य अ
संस्कृती यांचा अतूट संबंध आहे.

संस्कृती, ज्ञान, श्रद्धा व कौशल्ये आदींच्य
काही जीवनमूल्ये प्रदान करीत असते. त्यामुळे सं
अधिक परिष्कृत करते. याचाच अर्थ असा की, म
सामर्थ्य देण्याचे महत्त्वपूर्ण काम संस्कृतीच करीत
सामर्थ्य आणि निष्ठा समाजजीवनापासून प्राप्त होते.
आणि लिखित भाषिक स्वरूपात चालणारे सा
निर्मिलेल्या अनेकविध तपाने, कौशल्याने, मूल्याने
सामर्थ्यातून आणि निष्ठेतून साहित्याला सामर्थ्य मि
लोकांच्या मनावर आणि अंतःकरणावर प्रभाव नि
साहित्यही करीत असते. आजही ग्रामीण भागाती
लोकगीते, शाहिरी कविता यांची अभिरुची अधिक
समाजमाणसामध्ये असणाऱ्या संस्कृतीत आहे.
यांच्यामधील संबंध असा आहे.

कोणत्याही समाजामध्ये एखादा नवीन विचार
तो त्या समाजाच्या सांस्कृतिक विभिन्न स्तरावर स्व
एखाद्या समाजाच्या संस्कृतीबरोबर केलेल्या आदाना-
वारसा दुसऱ्या संस्कृतीमध्ये संक्रमित होतांनाही
समाजाच्या संस्कृतीचे वेगळेपण त्या संस्कृतीच्या म
संस्कृती परिवर्तनीय असली तरी त्याचे मूळ अस्ति
संस्कृती ही समाजनिर्मित जीवनपद्धती वा जगण्या
याने या जीवनपद्धतीत पोषक अशा अनेक घटक

# Satyashodhak Anna Bhau Sathe : A Humanitarian Litterateur

1st OCTOBER 2018

# CERTIFICATE

CAREER SPIRIT EDUCATION

॥ विद्याधनम् सर्वधनम् प्रधानम् ॥

This is to certify that Dr./~~Mr./Ms.~~ राजाराम तुकाराम सोनटक्के. of कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आष्टी. participated as a chairperson/ resource person / delegate in the One Day Interdisciplinary International Conference on ***Satyashodhak*** **Anna Bhau Sathe : A Humanitarian Litterateur** organized by **Career Spirit Education (LLP), Santacruz, Mumbai** on **1st October 2018** at **Maulana Abul Kalam Azad Research Center, Aurangabad.** He/ She has delivered a talk/ presented a paper entitled अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील समाजवास्तव.

| | | |
|---|---|---|
| Dr. Vasant Gaikwad | Dr. Ramesh Landage | Dr. Savita Kothawale |
| (Co-ordinator) | (Convener) | (Organizing Secretary) |

(4) सन 19-20

फेब्रुवारी-2020


# विद्यावार्ता®

SPECIAL ISSUE-2020

Peer Reviewed International Refereed Research Journal




## शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम व
## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

यांच्या संयुक्त विद्यमाने

# "राजर्षी शाहू, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान" या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद



प्राचार्य
डॉ.श्रीकृष्ण चंदनशिव

12) महात्मा जोतिबा फुले यांचे शैक्षणिक विचार
डॉ. राखी सिद्राम सलगर, औरंगाबाद ||50

13) राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणा
प्रा. सिसोदीया प्रदीप बन्सीधर, हदगांव ||52

14) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले व राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक विचार
डॉ. राजाराम सोनटक्के, बीड ||54

15) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मविषयक विचार
प्रा. डॉ. सुनिल रजपूत, उस्मानाबाद ||57

16) इतर मागासवर्ग प्रवर्गांच्या विकासात मुद्रीत माध्यमांची भूमिका
सरला नाईक, औरंगाबाद ||59

17) महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्यविषयक विचार
प्रा. डॉ. सुर्यवंशी रामहरी मधुकर, उस्मानाबाद ||63

18) महात्मा फुले यांचे स्त्रीविषयक विचार
प्रा. डॉ. पवार विद्युलता शाहूराव, कळंब ||65

19) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जलव्यवस्थापन विषयक विचार
नवनाथ विश्वनाथ खेत्री, औरंगाबाद ||67

20) राजर्षी शाहू महाराज आणि सत्यशोधक विचार
शेख शहारुख फारुख, बीड ||70

21) महात्मा जोतीबा फुले यांचे कृषि विषयक विचार
योगेश रामकृष्ण वायाळ, औरंगाबाद ||72

22) राजर्षी शाहू महाराजांचे स्त्रीविषयक कार्य आणि सद्यस्थिती
श्रीमती. प्रा. मडके साधना हरिदास, उस्मानाबाद ||74

23) छत्रपती शाहु महाराजांचे शैक्षणिक कार्य
प्रा. श्रीमती सरवदे वर्षा तात्यासाहेब, उस्मानाबाद ||76

24) छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे आरक्षण विषयक विचार
अधिकराव महारु पाटील, जळगाव ||78



www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

# INDEX

01) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अर्थ आणि कृषी विषयक विचार
**खंदारे एन.व्ही, नांदेड** ||17

02) महात्मा फूले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्यातील योगदान :- एक अभ्यास
**प्रा. कोटरंगे दत्ता नामदेव, उस्मानाबाद** ||19

03) महात्मा फुले यांचे शैक्षणिक योगदान
**प्रा. खजूरकर डी. टी., उस्मानाबाद** ||21

04) शाहु, फुले, आंबेडकर यांचे सामाजिक विचार
**लव्हाळे दत्ता रामनारायण** ||23

05) राजर्षी शाहु महाराजांचे आर्थिक विचार / धोरण
**डॉ.महेश विनायक रोटे, औरंगाबाद** ||27

06) राजर्षी शाहु महाराज, महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार
**प्रा. पालवे रामनाथ सुर्यभान, जालना** ||29

07) राजर्षी शाहू, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार
**प्रा. दत्तात्रय प्रभुराव मुंढे, बीड** ||33

08) शाहू, फुले, आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार
**प्रा. भुषण मधुकर पाटील, नाशिक** ||36

09) शाहु, आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार : एक अभ्यास
**प्रा. हनुमंत भारत सरतापे, नंदुरबार** ||39

10) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार
**प्रा. बिराजदार डी. पी., प्रा. डॉ. गणापुरे आर. डी., उस्मानाबाद** ||42

11) राजर्षी शाहू महाराजांचे स्त्रीविषयक विचार
**साखरे आशा कारभारी, औरंगाबाद** ||46

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

14

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले व राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक विचार

डॉ. राजाराम सोनटक्के
मराठी विभाग, अॅड.बी.डी.हंबर्डे महाविद्यालय, आष्टी जि.बीड

**********

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर :-**

शिक्षणामूळे माणूस सुसंस्कृत होतो. शिक्षण हा मानवी जीवनाचा अविभाज्य असा भाग आहे. शिक्षणामूळे व्यक्तीचा विकास तर होतोच त्याच बरोबर समाजाचाही विकास घडतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते सामाजिक विषमता दूर करावयाची असेल तर त्यासाठी शिक्षण हा एकमेव मार्ग आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी चालवलेले सामाजिक, धार्मिक, राजकिय व शैक्षणिक योगदान खूपच महत्वाचे आहे. शिक्षण म्हणजे ज्ञान आहे व ते प्रत्येक व्यक्तीने मिळवणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीने ज्ञानाच्या बळावर स्वतंत्रपणे विचार करावयास शिकले पाहिजे.

अस्पृश्यांचा उध्दार व्हावा यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी 'बहिष्कृत हितकारणी ' सभेची स्थापना करुन दलितांसाठी वस्तीगृहे सुरु केली. तसेच वाचनालय, समाज केंद्र आणि आभ्यासमंडळे उघडली. कृषी, शाळा व औद्योगिक शाळा सुरू करून दलीतवर्गात सुधारणा करण्याचे कार्य केले. शैक्षणिक विकास करायचा असेल तर प्राथमिक शिक्षण सक्षम होणे आवश्यक असल्याचे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात "प्राथमिक शिक्षणाचा प्रसार हा राष्ट्रीयदृष्ट्या अत्यंत महत्वाचा आहे. सध्याच्या युगात ज्या देशातील बहुजन समाज निरक्षर आहे. अशा देशाच्या जीवनकलहात टिकाव लागायचा नाही हे सांगावयास नकोच प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार सर्वांगीन राष्ट्रीय प्रगतिच्या इमारतीचा पाया आहे. केवळ लोकांच्या खुशीवर हा प्रश्न सोडविल्यास प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होण्यास कित्येक शतके लागतील. म्हणून शिक्षणाच्या बाबतीत सक्तीचा कायदा करावा लागतो. आघाडीत आलेल्या जगातील सर्व देशांनी सक्तीचा कायदा करूनच लोकांची निरक्षरता हद्द पार केली. असे आपणास दिसून येते. जे वर्ग अधिक शिक्षणाचा लाभ घेतात ते शोषणातून मुक्त होतात."

शिक्षणामुळे चांगले काय ? वाईट काय ? याची जाणीव होते. अन्याय आणि अत्याचार त्याला सहन होत नाहीत. जीवन, जाणीव, जगाची ओळख महान मानवी संस्कृतीचा आनंद त्याला अनुभवता येतो. ज्या समाजात निरक्षरता, अज्ञान, शिक्षणाचा अभाव असा जनसमुदाय पशुत्वाच्या पातळीवरच आपले जीवन जगत असतो. 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी' चे धोरण ठरवताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपले शिक्षण संस्थेचे धोरण हे केवळ शिक्षण प्रसार करण्याचे नसून भारतात बौद्धिक नैतिक आणि सामाजिक लोकशाहीचा ज्यापासुन विकास होऊशकेल अशी मनोवृत्ती घडून आणण्याचे कार्य शिक्षण प्रसाराच्या माध्यमातून करावयाचे आहे. आजच्या भारताला याच गोष्टीची गरज आहे. आणि भारताविषयी सदिच्छा बाळगणाऱ्या सर्व लोकांनीही देशात घडवून आणली पाहिजे. विद्यापीठ आणि महाविद्यालयीन शिक्षणावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले विचार स्पष्ट शब्दात व्यक्त केले आहेत. उच्च शिक्षण असेल तर देशातील प्रश्न सुटू शकतात त्यासाठी त्यांनी उच्च शिक्षण समाजातील खालच्या स्तरापर्यंत जावे यासाठी 'कमवा आणि शिका' ही शिक्षणपध्दती आमलात आणावी. तसेच फीमध्ये सवलत देण्यात यावी. असे विविध उपाय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुचविले आहेत. विद्यापीठाची स्थापना परीक्षा घेणारी संस्था म्हणून करणे चूकीचे आहे. त्यामूळे विद्यापीठाला संशोधन आणि उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारता आला नाही. परीक्षा आणि शैक्षणिक दर्जा हे शिक्षणाचे वेगवेगळे भाग आहेत. त्यामूळे महाविद्यालय आणि विद्यापीठाचे शिक्षण वेगवेगळे झाले आहे. आर्थिक दृष्ट्या दुर्बलतेमुळे ट्रेखोल ही एकाच वेळी सर्व विषयात पास होणार नाहीत. म्हणून त्यांना पूढील वर्गात सवलत देणे गरजेचे आहे.

प्रत्येक मानवाच्या भावी आयुष्याची वाटचाल प्राथमिक शिक्षणामुळे होते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्राथमिक शिक्षण हे राष्ट्रीय इमारतीच्या पायासारखे असल्याचे म्हटले आहे. प्राथमिक शिक्षणाचे निश्चित ध्येय असले पाहिजे. त्यामूळे ती व्यक्ती फक्त लिहिता - वाचता येण्यापुरती असू नये तर ती संपूर्ण साक्षर होऊन बाहेर पडणे आवश्यक आहे. संपूर्ण आयुष्य शिक्षण घेण्यातच असली पाहिजे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्त्रीयांच्या शिक्षणाविषयी अतिशय सतर्क होते. त्यांनी स्त्रीयांच्या शिक्षणाचा पुरस्कार केला. महाड येथे सत्याग्रह केला त्यावेळी त्यांनी स्त्रीयांना उपदेश केला होता "तुम्ही अडाणी असल्या तर शिक्षण हे खालच्या वर्गाला मिळू शकणार नाही असे त्यांचे मत होते कलम ४५ प्रमाणे भारतातील सर्व मुलामुलींच्या शिक्षणाची व्यवस्था म.फुलेंनी केली. मनोस्मृतीची

बंदी तोडून काढण्याचे सर्वप्रथम कार्य म.फुलेंनी केले. तद्नंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कायद्याच्या चौकटीत बसवून तो अधिकार इतरांना मिळवून दिला. निर्मिकाविषयी म.फुले यांनी विचार मांडताना म्हटले आहे, "मानव सारखे निर्मिके निर्मिले।। कमी नाही केले एका।।" त्यांच्या मते परमेश्वराकडे त्यांची सर्व मानवलेकरे ही समान आहेत.यात कोणी श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नाही. स्वार्थी संवर्णाकडून विकृत धर्मशास्त्र निर्मित मानवनिर्मित मानवलेकरे ही समान आहेत. यात कोणीही श्रेष्ठ वा कनिष्ठ नाही. स्वार्थी संवर्णाकडून विकृत धर्मशास्त्र निर्मित, मानव निर्मित, जातीभेद, वर्णभेदाची विषमता निर्माण होऊन समाजात जो विस्कळीतपणा निर्माण झालेला आहे. जी असमानता निर्माण झालेली आहे. त्याचे कारणच अविद्या असल्याचे महात्मा फुले सांगतात.

शिक्षणावर विशिष्ट वर्गाची मत्तेदारी होती, कब्जा होता. त्यामूळे सामाजिक, धार्मिक असमानतायुक्त प्रतिबंध आणि भीषण दारिद्रय यामूळे स्त्री शुद्र, अस्पृश्य वर्गाची मुले शाळेत जाऊ शकत नव्हती. जी कोणी अत्यंत थोडी मुले बहुजन व शुद्र यांची मुले शाळेत गेलीच तर पुन्हा ती शाळा सोडून दारिद्रयामूळे नंतर काम मिळाल्यास ती शाळा सोडून देत असत. त्यासाठी स्पृश्यअस्पृश्य वर्गाच्या मुलांला शाळेत पाठविण्यासाठी त्यांच्यात शाळेची गोडी निर्माण व्हावी यासाठी सरकारने विशेष प्रयत्न करायला हवेत. सन १८८२ मध्ये हंटर आयोगासमोर म.फुले यांनी सरकारकडे मागणी केली की , अतिशुद्रांना शिष्यवृत्या व वार्षिक बक्षीसे असे उपक्रम राबवून शिक्षणाचे प्रयत्न केले पाहिजेत या वर्गात शिक्षणाचे प्रमाण वाढविण्यासाठी , प्रत्येक गांवात शाळांची संख्या वाढवावी. योग्य शाळेत आपल्या मुलांना शिक्षण द्या. तुम्हाला लिहिता आले पाहिजे. त्यामुळे आपल्या परिस्थितीमध्ये सुधारणा होईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्त्री-पुरुष सहशिक्षण देण्यास प्राधान्य देत. विरोध करणारास ते म्हणतात, "स्त्री-पुरुषांना वेगळे ठेवल्याने त्यांची नितीमत्ता शाबुत राहते हा निव्वळ भ्रम आहे. एखादा तरुण निर्जन वनात राहून ब्रम्हचारी राहू शकेल किंवा एखादी स्त्री तुरुंगात डांबल्यास तिला कुणाचा संसर्ग लावून दिल्यास ती साध्वी राहू शकेल ? मग नितीमत्तेचे बुजगावणे कशासाठी?" त्यामूळे ते अशा लोकांच्या नितीमत्तेला किंमत देत नाहीत.

अशा पध्दतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्राथमिक शिक्षण, उच्च शिक्षण, स्त्री शिक्षण विषयक विचार विस्तृतपणे व्यक्त केलेले दिसून येतात.

**महात्मा ज्योतिराव फुले:-**

महात्मा फुले यांनी प्रथम अस्पृश्यांसाठी शाळा काढल्या. त्यावेळी शिक्षणावर बंदी असताना देखील महात्मा फुलेंनी खुप मोठे धाडस केले. अस्पृश्यांविषयी असणारी तळमळ यावरून दिसून येते. वैदिक धर्माने घातलेली बंधने झुगारूण त्यांनी सर्वप्रथम आपल्या पत्नीस शिकवले. त्यानंतर पत्नी सावित्री बाई यांनी मुलींना शिकवण्यास सुरूवात केली. त्यामूळे देशातील एकमेव 'आद्यशिक्षिका' सावित्रीबाई ठरल्या. महात्मा फुले शिक्षणाची व्याख्या करताना म्हणतात की, "खरं आणि खोटं यातील फरक कळण्याची अक्कल जे निर्माण करते ते खरे शिक्षण होय". खऱ्यासाठी संघर्ष करायला लावते ते खरे शिक्षण होय. त्यासाठी आत्मपरीक्षणाची गरज आहे. डॉ.आंबेडकरांनी महात्मा फुलेंना गुरू मानले. महात्मा फुलेंचा मेकॉलेच्या शिक्षण पध्दतीला विरोध होता. कारण शिक्षण हे उच्चवर्णीयांच्या ताब्यात असण्यायोग्य शिक्षक असावेत. हे शिक्षण प्रतिगामी म्हणजेच पंतोजी, भट असे न भरता निम्न अस्पृश्य, बहुजन वर्गातील भरावेत. प्राथमिक शाळांच्या खर्चासाठी मध्यवर्ती निधीची उपाययोजना करावी. स्थानीक नगरपालिकेला मिळणाऱ्या एकुन करापैकी अर्धी रक्कम प्राथमिक शिक्षणावर खर्च करावी. हंटर आयोगाकडे शिक्षकांचे वेतन हे पुरेसे म्हणजे कमीत-कमी १२ रुपये ठेवावे. असे सांगताना मात्र शिक्षक हे मागासवर्गीय असावेत असे म्हणतात. तसेच ते प्रशिक्षित असावेत.

स्त्रीयांविषयीच बोलतांना ते स्त्री ही पुरूषपेक्षा श्रेष्ठ आहे. त्याचे कारण सांगताना म्हणतात, पुरुष शिकुण एकटा शहाना होतो. स्त्री शिकली तर संपूर्ण कुटूंब शहाणे होते. गुलामीच्या, अज्ञानाच्या आणि अज्ञानाच्या भावी दैववादाच्या गाढ झोपेत गेलेल्या या अतिशुद्र बहुजनवर्गास जागृत करण्यासाठी महात्मा फुले यांनी खालच्या स्तरातील स्त्रीयांसाठी प्राथमिक शिक्षणावर मोठा भर दिला. कारण हा काळ म्हणजे जीवनाची सर्व क्षेत्रे शुद्रातील शुद्रांना प्रतिबंधित असल्याने जिथे या स्त्री शुद्रवर्गास शिक्षणाचा गंधच नव्हता. त्या समाजासाठी उच्च शिक्षण म्हणजे कल्पनेचे चित्र रंगविल्याप्रमाणे स्वप्नवत मनोरे बांधण्याप्रमाणे होते. सर्व ठिकाणी शाळा कमी होत्या शिक्षण घेणारा बहुसंख्य समाज हा ब्राम्हण होता. उच्चवर्ग होता. धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, पारंपरिक प्रतिबंध व अवनितीमूळे आणि आर्थिक असाह्य विपन्नेतेमूळे हा निम्न कनिष्ठ वर्ग शाळेत शिकू शकत नव्हता. या करिता स्त्री -शुद्र अस्पृश्यांच्या प्रगतीसाठी व सर्वांगीन उन्नतीसाठी सरकारने सर्वप्रथम प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत विशेष आग्रह धरला पाहिजे व शाळांची संख्या वाढवली पाहिजे. महात्मा फुले यांचे कार्य पुढे चालविण्याचे कार्य शाहू महाराजांनी सुरु केले. प्रजाहितदक्ष सत्ताधिष असा उल्लेख राजर्षी शाहू महाराजांचा केला जातो. एक आदर्श राजा, महापुरुष, बहुजन व दलित समाजाचा लोकप्रिय नेता म्हणून त्यांची ख्याती शेवट पर्यंत टिकून आहे. त्यांचे कार्य कोल्हापुर किंवा महाराष्ट्रापूरते मर्यादित न राहता भारतातही लोकप्रिय झालेले

पहावयास मिळते. सर्व सामान्य लोकांच्या कल्यानासाठी त्यांनी प्रयत्न केले. समाजातील लोक पारंपरिक बंधनात अडकले आहेत हे ओळखून त्यांना बाहेर काढण्याचे काम त्यांनी केले.

**राजर्षी शाहू महाराज :-**

राजर्षी शाहू महाराज यांनी बहुजन समाजातील विकास होण्यासाठी शिक्षण विषयक योजना तयार केली. प्राथमिक शिक्षण पक्के केले तरच उच्च शिक्षण मजबूत होईल. असे त्यांचे मत होते. जनतेमध्ये उच्च शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी चागल्या प्रकारचे प्रयत्न केलेले दिसून येतात. शक्य-तितक्या लवकर जनतेस स्वराज्य देण्याचे त्यांचे धोरण होते, विद्या प्रसार करण्याकडे त्यांचा कल होता. तत्कालीन परिस्थितीमध्ये रुढी, कल्पना, परंपरा, दैववादी व अंधश्रध्दा समाजात निर्माण झालेली असताना स्त्रीला शिक्षण दिले तर कुटूंबास हानिकरक होईल अशी अंधश्रध्दा समाजामध्ये रुढ होती. ही कल्पना लक्षात घेऊन राजर्षी शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणाकडे जास्त भर दिला. स्त्री शिक्षणामुळेच कुटूंबाचा आणि समाजाचा विकास घडू शकतो हे त्यानी ओळखले होते. त्यामुळे स्त्रीयांना कुटूंबात व समाजात आदराचे स्थान मिळू शकते त्यासाठी शाहू महाराजांनी मुलींसाठी शिष्यवृत्तीची सोय केली होती.

राजर्षी शाहू महाराजांनी दलितांसाठी खास शाळा उघडल्या. दलितांची सुधारणा कराक्याची असेल तर त्यांना शिक्षण देणे महत्त्वाचे आहे. तत्कालिन काळात फक्त ब्राम्हणांची मक्तेदारी शिक्षण क्षेत्रात दिसून येत होती. शाहू महाराज राजपदावर येण्याआगोदर दलितांना शिक्षण मिळालेले दिसत नाही. शाहू महाराजांनी दलितांसाठी शाळा उघडून मोलाचे कार्य केलेले आहे.

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात विद्यार्थ्यांना वस्तीगृहाची सोय करुन दिली. वस्तीगृहात राहून जास्तीत जास्त विद्यार्थी शिक्षण घेवू शकतील असे त्यांचे मत होते. त्यांनी इ.स. १९०७ मध्ये अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह सुरु केले. या वस्तीगृहात विद्यार्थ्यांची सोय झाल्यामुळे ते शिक्षित होवू शकले.

राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणावर विशेष भर दिलेला दिसून येतो. त्याच बरोबर कोल्हापूर संस्थानात विविध जातीच्या मुलांसाठी तसेच स्त्रीयांसाठी विशेष सोय केली असल्याचे दिसुन येते. शाहू महाराजांनी समाजामध्ये शिक्षणविषयक उत्कृष्ट कार्य केलेले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतीबा फुले व राजर्षी शाहू महाराज यांनी शिक्षण क्षेत्रात अतुलनीय कामगीरी केलेली दिसून येते. त्यांच्या शैक्षणिक कार्यामुळे जगातील ज्ञान-विज्ञानाची आणि राज्य व्यवस्थेची ओळख तर झालीच; परंतू त्यांनी दिलेल्या शिक्षणामुळे विविध जाती धर्माचे, पंथाचे आणि वंशाचे लोक एकत्रीतपणे शिक्षण घेऊ शकले आणि घेत आहेत. त्यामुळे देशाच्या विकासासाठी सर्व शिक्षित माणसांचा उपयोग होत आहे. त्यामुळे साक्षरतेचे प्रमाण वाढत आहे. त्यामधून शास्त्रज्ञ, शिक्षक, वकील, प्राध्यापक, डॉक्टर व वरिष्ठ अधिकारी निर्माण झालेले आहेत. शाहू, फुले, आंबेडकर यांच्या कार्यामुळे स्त्रीयांना, दलितांना व गरिब लोकांना शिक्षण घेणे सोपे झाले आज स्त्री - पुरुष खांद्याला खांदा लावून काम करीत आहेत. शिक्षणामुळेच देशाची उंची वाढली आहे.

**संदर्भ ग्रंथसूची:-**

१. किर धनंजय-२००२ तिसरी आवृत्ती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, भाग - १. क्षितीज पब्लिकेशन नागपूर
२. निंबाळकर वामन (संपा)-डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार धारा, प्रबोधन प्रकाशन नागपूर ऑक्टो. २००६
३. गायकवाड आर. डी. -आंबेडकरी चळवळीच्या आठवणी, सुगावा प्रकाशन, पुणे, सप्टें १९९३
४. महात्मा फुले साहित्य आणि चळवळ - संपादक हरी नरके, सन २००६
५. य.दि.फडके-महात्मा फुले समग्र वाड्मय
६. किर धनंजय, डॉ. मालसेस. ग. (संपा)-महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ - म.फुले समग्र वाड्मय
७. भोसले ए.एस. संपादित - राजर्षी शाहू काल, विचार आणि कार्य, कोल्हापूर (१९७५)
८. डॉ. अनिल कठारे-फुले, शाहू, आंबेडकर.
९. जाधव भ.बा. १९७१ (संपा) राजर्षी शाहू महाराजांची भाषणे कोल्हापूर, पहिली आवृत्ती.

❑❑❑

Vidya Vikas Mandal Pathrud's,

# SHANKARRAO PATIL MAHAVIDYALAYA
## BHOOM



Tq. Bhoom Dist. Osmanabad-413504 (Maharashtra)
NAAC Re-accredited with 'B' Grade
(In Collaboration with Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad)

# One Day Interdisciplinary National Conference
on
## " CONTRIBUTION OF SHAHU MAHARAJ, MAHATMA PHULE & DR. BABASAHEB AMBEDKAR"
(27th February, 2020)

This is to certify that Prof./Dr./Shri./Smt./ डॉ. राजाराम सोनटक्के

Of ॲड. बी.डी. हंबर्डे महा. आष्टी has participated in One Day Interdisciplinary National Conference on "Contribution of Shahu Maharaj, Mahatma Phule & Dr. Babasaheb Ambedkar" organized by IQAC of Shankarrao Patil Mahavidyalaya, Bhoom, Dist. Osmanabad On Thursday, 27th February, 2020. He/She Partcipanted / Chaired a session / Presented a paper on डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. फुले व राजर्षी शाहु महाराजांचे शैक्षणिक विचार

| | | |
|---|---|---|
| Prof. Tanaji Borade | Dr. Anuradha Jagdale | Dr. Shrikrishna Chandanshiv |
| Convener | Coordinator, IQAC | Principal |

19-20



ISSN: 2454 - 7905

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

*A Peer Reviewed Referred Journal*

Quarterly Research Journal

(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)

website: WWW.WIIDRJ.com

Vol. I Special ISSUE - XXIII Year – 6 14 March 2020

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई.

## स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड.

Special Issue for Sanskrit

# One Day National Level Interdisciplinary Conference

(एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद)

# संस्कृत - मराठी ऋणानुबंध

संपादक

प्रा. सचिन कंदले
आयोजक व संस्कृत विभाग प्रमुख

डॉ. संजय शिरोडकर
प्राचार्य व संयोजक
स्वा. सावरकर महाविद्यालय. बीड.

सह संपादक

प्रा. डॉ. सोपान सुरवसे
प्रा. डॉ. रमेश गटकळ
प्रा. आनंद रत्नपारखे
प्रा. अशोक रुपनोर

Bhartiy Shikshan Parasarak Sanstha
Kholeswar Madhyamic Vidyalaya, Ganesh Nagar, Kuttar Vihir Ambejogai.
Email: bsps2011@rediffmail.com

::Address for Correspondence::
Mrs. Pallavi Laxman Shete
Editor in Chief: Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Referred)
Principal, Sanskrti Public School, Nanded (MH. India)
**Email:** Shrishprakashan2009@gmil.com **Website:** WWW.WIIDRJ.com
Dr. Rajesh G. Umbarkar
House No.624 - Belanagar. Near Maruti Temple, Taroda (KH), Nanded – 431605(India –Maharashtra)
**Email:**umbarkar.rajesh@yahoo.com Shrishprakashan2009@gmil.com **Mob. No:** 9623979067
**Director** : Mr. Tejas Rampurkar (For International contact only +91-8857894082)

# Worldwide International Inter Disciplinary Research (A Peer Reviewed)

**Worldwide International Inter Disciplinary Research (A Peer Reviewed)** is quarterly published journal for Research scholars, teachers, businessman and scientists to integrate disciplines in an attempt to understand the complexities in the current affairs.

We also believe that both researchers and practitioners can contribute their knowledge by translating understanding into action and by linking theory and practice. This would enhance the relevance and thought in various related fields.

This Journal expected to bring together specialists in the field of commerce, economics, management and industry from different part of the world to address important issues regarding commerce, management and economics. One of the objectives of the journal is to create dialogue between scholars of various disciplines.

The editor, editorial team and the publisher do not hold any responsibility for the views expressed in **Worldwide International Inter Disciplinary Research (A Peer Reviewed)** or for any error or omission arising from it.

The journal will cover the following Faculties for All Subject:

| | |
|---|---|
| • Arts/ Humanities / Soc. Sci. / Sports | • Engineering |
| • Commerce | • Medical /Ayurveda |
| • Science | • Law |
| • Education | • Journalism |
| • Agriculture | • Mass Communication- **Library sci.** |
| • Pharmaceutical | • Social Work |
| • Management | • Any Other |

***Printed by***
Anupam Printers, Nanded.

**Cost: Rs. 300/-**

**Director : Mr. Tejas Rampurkar** (For International contact only +91-8857894082)

**Editors of Worldwide International Peer Reviewed Journal are not responsible for opinions expressed in literature published by journal.**

The views expressed in the journal are those of author(s) and not the publisher or the Editorial Board. The readers are informed, authors, editor or the publisher do not owe any responsibility for any damage or loss to any person for the result of any action taken on the basis of the work (c) The articles/papers published In the journal are subject to copyright of the publisher. No part of the publication can be copied or reproduced without the permission of the publisher.

# INDEX



| Sr. No. | Title of the Paper | Name of Author | Page No. |
|---|---|---|---|
| 01. | IMPORTANCE OF YOGA IN STRESS MANAGEMENT | Dr.Rama Pande | 01 |
| 02. | PRACTICES OF AIR SANITAITON IN SANKRIT LITERATURE OF AYURVEDA | Krishna V. Bartakke | 05 |
| 03. | IMPACT OF SANSKRIT ON INDIAN ENGLISH NOVELS WITH SPECIAL REFERENCE TO MUSIC | Laxmikant Bahegavankar | 08 |
| 04. | IMPACT OF SANSKRIT AND DIGITAL LIBRARIES ON HIGHER EDUCATION | Mr.Thorat Uttam Dagduji | 12 |
| 05. | ASHOKA PLANT IN SANSKRIT LITERATURE | Deepa R. Deshpande Shimply N. Joshi<br>Akash S. Gavate<br>Dr.Rupali B. Kulkarni | 16 |
| 06. | A STUDY OF NATYASHASTRA AND IMPACT ON WORLD LITERATURE | DR. Mahananda C. Dalvi | 20 |
| 07. | WATER PURIFICAITON PROCESSES IN ANCIENT SANSKRIT LITERATURE | Krishna V. Bartakke | 24 |
| 08. | INFLUENCE OF SANSKRIT ON PRAKRIT GRAMMAR | Prajakta Dharmarao | 27 |
| 09. | SCIENCE IN SANSKRIT | Prof. Pathak Suraj Jivanrao | 31 |
| 10. | THE BRAVE AND EXTRAORDINARY SANSKRIT SCHOLARPANDITARAMABAISARASWATI | Deshpande Monica Madhukar | 35 |
| 11. | CRITICAL ANALYSIS OF MOTIVATION AND ADJUSTMENT AS PSYCHOLOGICAL CONCEPTS IN BHAGAVAD GITA | Mr. Toshnival Mahesh Dwarkadas | 38 |
| 12. | CHEMICAL SCIENCE & SCIENTIFIC ELEMENTS IN SANSKRIT & VEDAS | Dr. Umakant Chanshetti | 42 |
| 13. | REVIEW ON : USE OF SANSKRIT FOR NATURAL LANGUAGE PROCESSING | Choudhari Bhargavram Yogeshwar<br>Kale Sanjay Ramchandra | 46 |
| 14. | Śivayogapradīpikā: an unknown Sanskrit yoga text. | Julia Gabriela Walker | 51 |
| 15. | Nyāya in Sanskuta | Dhanashree Shejwalkar | 59 |
| 16. | CONSPICUOUS VENEER BETWEEN ENGLISH AND SANSKRIT: A REVIEW | Dr. Sangeeta S. Sasane | 66 |
| 17. | A STUDY OF LONELINESS AND SELF CONCEPT AMONG BOYS AND GIRLS COLLEGE STUDENTS | Dr. Daitkar Arun Rajaram | 70 |
| 18. | BHARATA MUNI'S NATYA-SHASTRA- THE SOUL OF INDIAN THEATRE | Dr. Deshpande Madhuri Madhukar | 75 |
| 19. | BIODIVERSITY AS REFLECTED IN VEDAS | Rupali Raghunath Wadekar | 80 |
| 20. | CONTRIBUTION OF KALIDASA IN ENGLISH LITERATURE | Dr. Korde Rajabhau Chhaganrao | 85 |
| 21. | Concept of 'Liquid and it's properties' in *Vaiśeṣika Darṣana* | Manisha Puranik | 90 |
| 22. | IMPORTANCE OF YOGA: A REVIEW | Mr. Lahoti Ramesh Kachrulal | 95 |
| 23. | KAUTILYA'S THOUGHTS ON TRADE SYSTEM IN KAUTILIYAM ARTHASHASTRAM | Ms. Pratibha B. Dhondkar | 98 |
| 24. | SIR MONIER WILLIAM AND *SHAKUNTALAM* | Dr. S. S. Sasane | 102 |

| | | | |
|---|---|---|---|
| 148. | वेदशास्त्रातील पाणी आणि पर्यावर्णाचा - एक चिकित्सक अभ्यास | प्रा. नारायण भर्तरीनाथ शिंदे | 572 |
| 149. | मराठी भाषेसाठी संस्कृत भाषेचे योगदान | प्रा. बालासाहेब विष्णू कटारे | 577 |
| 150. | कालिदास आणि मराठी साहित्य | डॉ. अंजली आनंद चौरे | 581 |
| 151. | संस्कृत भाषेचा इतर भाषांवर झालेला परिणाम | डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे | 583 |
| 152. | संस्कृत भाषेचा वैज्ञानिक परिभाषेवरील प्रभाव | डॉ. कवीश्वर रुपाली विजय | 587 |
| 153. | संस्कृत लोककथांचे स्वरुप विशेष | प्रा. डॉ. ज्ञानेश्वर को. गवते | 589 |
| 154. | यज्ञ : पर्यावरणावार होणारा परिणाम | तारे अमृता गजानन | 592 |
| 155. | संस्कृत भाषेतील शब्द, म्हणी व वाक्प्रचाराचा मराठीत वापर | प्रा. ज्योती उद्धवराव मामडगे | 595 |
| 156. | संस्कृत भाषेतील न्याय आणि मराठी भाषेतील वाक्प्रचार यांचा ऋणानुबंध | प्रा. डॉ. मीनाक्षी सुभाष भांदककर | 598 |
| 157. | संस्कृत ः मराठी ऋणानुबंध | प्रा. डॉ. मीनाक्षी देव | 604 |
| 158. | संस्कृत व मराठी नाटकांचा अभ्यास | डॉ. राजाराम सोनटक्के | 607 |
| 159. | योगवासिष्ठ संस्कृत ग्रंथाचे मराठी अनुवाद | डॉ. निवेदिता सराफ | 611 |
| 160. | प्रधानमंत्री पिक योजना एक महत्त्वपुर्ण वरदान | डॉ. अशोक मारुती कोरडे | 616 |
| 161. | गाय : वैज्ञानिक महत्व | प्रा.सचिन कंदले | 621 |
| 162. | संस्कृत सुभाषितांचा मराठी भाषेवर झालेला परिणाम | डॉ. मधुकर क्षीरसागर | 623 |
| 163. | संस्कृते विज्ञानम् (Science in Sanskrit) | प्रा. रमाकांत आयाचित | 627 |
| 164. | योग- विज्ञान का अर्थ और विविध प्रकार | प्रा. डॉ. सुनील म. पंढरे | 629 |
| 165. | योगा में कुन्डलिनी जागृती - एक अद्भुत शक्ति का अध्ययन | श्री. करण सुनील जैन | 632 |
| 166. | अग्निहोत्र पर्यावरण पूरक सत्य | प्रा.डॉ.रूपाली कुलकर्णी<br>शिंपली नितीन जोशी<br>आकाश सुभाष गवते<br>प्रा.दीपा देशपांडे | 635 |
| 167. | मानवी जीवनात योगाचे महत्व | डॉ. सुभेदार भाग्यश्री प्रभाकरराव | 641 |

Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed) ISSN – 2454 - 7905

# संस्कृत व मराठी नाटकांचा अभ्यास

**डॉ. राजाराम सोनटक्के**
मराठी विभाग प्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,आष्टी.

संस्कृत भाषा जगातील अतिप्राचीन भाषा आहे. त्या भाषेत धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चारही पुरुषार्थ साधण्याला उपयोगी असे विपुल साहित्य उपलब्ध आहे. विपुल शास्त्रीय वाङमय आहे. आजही संस्कृत भाषेत विविध विषयावर विविध प्रकारचे उत्कृष्ट विपुल साहित्य निर्माण झालेले आहे. प्राचीन संस्कृत ग्रंथावर अनेक विद्वानांनी अभ्यासपूर्वक विपुल टीकाग्रंथ लिहिले आहेत. संस्कृत भाषा प्राचीन, समृध्द, अभिजात आणि शास्त्रीय भाषा आहे. हिंदू, बौध्द, जैन व शीख धर्मीयांची उपासनेची भाषा आहे. भारतातील २३ शासकीय राजभाषांपैकी एक मानली जाते. नेपाळमध्ये या भाषेला महत्त्वपूर्ण स्थान असल्याचे दिसून येते या भाषेमध्ये अनेक सुभाषिते दिसून येतात. विख्यात व्याकरणतज्ञ पाणिनीने इ.स. पूर्व काळात "अष्टाध्यायी" या ग्रंथाद्वारे संस्कृत भाषेला प्रमाणित केले. संस्कृत भाषेतील अनेक शब्द भारतीय भाषंमध्ये जसेच्या तसे योजले जात असतात. संस्कृत भाषेचे आद्यकवी वाल्मीकी हे होत. रामायन हे महाकाव्य त्यांनी लिहिले अशा या भाषेतील काही शब्द मराठी भाषेत जसेच्या तसेच आलेले पहावयास मिळतात त्यात कोणतेही बदल झालेल दिसून येत नाहीत. नाटक हा एक सर्वांच्याच आवडीचा व करमनुकिचा दृष्य व श्राव्य साहित्यप्रकार आहे. कारण ब्रम्हदेवाच्या आज्ञेवरुन देवांच्या मनोरंजनासाठी भरतमुनींनी नागदेवाची निर्मिती केली तसेच संवाद व अभिनयाद्वारे नाटक साकार होत असल्याने त्याचा अनुभव दृष्य व श्राव्य अशा दोन्ही पातळ्यावर घेतला जातो. म्हणूच शब्दांनी तयार केलेला संवाद सभिनय सादर करण्याची कला म्हणजे 'नाटक' असे म्हटले जाते. नट, नाचणे, अभिनय करणे यासारख्या शब्दाद्वारे 'नाटक' हा शब्द पुढे आला. पाणिनीच्या मतानुसार 'नट' हा धातू नृत्य-नर्तन करणे या अर्थाचा आहे.

मराठी साहित्य निर्मितीमध्ये आरंभापासून पाहिले असता असे दिसून येते की, साधारणत: इ.स. १८०० पर्यंत मराठी वाङमय हे परंपरंतून निर्माण झाले. पेशवाईच्या अखेरीस इंग्रजी सत्तेचा उगम झाला. पेशवाईचा नाश आणि इंग्रजांचा उदय या घटना महत्त्वाच्या मानल्या जातात. इंग्रजांनी भारत देश काबीज केला. आणि महाराष्ट्रात या घटनेचे दुरगामी परिणाम दिसू लागले कारण महाराष्ट्र विशेषत: पुणे हे सत्ताकेंद्र होते. दुसऱ्या बाजीरावाने ब्रम्हावतीस वास्तव्य केले आणि महाराष्ट्रात अवकलेने ठाण मांडले आणि याच स्थित्यंतराचे परिणाम साहित्यालाही भोगावे लोगले. या काळात साहित्यिकांना जणू काही मरगळ आली होती. रसरसीत, जिवंत, चैतन्यमय असा कोणताच साहित्यप्रकार या काळात निर्माण होवू शकला नाही. मान वर करुन पहावे असे कोणतेच क्षेत्र राहिले नव्हते म्हणूनच इ.स.१८०० नंतरचे काही दिवस साहित्य पोरकेच राहिले. परंतू एक गोष्ट मात्र अत्यंत महत्त्वाची ठरली आणि ती म्हणजे इंग्रजी भाषेचा परीचय झाला. अणेक पंडित इंग्रजीतील वाङमय वाचू लागले. आणि त्यांना जणू सुवर्णभांडार सापडल्याचा आनंद झाला. त्या काळात इंग्रजीतून भाषांतर करण्यावर भर असला तरी संस्कृत आणि फारसी वाङमयातूनही भाषांतरे झाली विशेष म्हणजे संस्कृत नाटके किंवा काव्ये यांचे अनुवाद करण्याची कल्पना आधीच्या काळात कोणासही रुचली वा सुचली नव्हती. जी या कालखंडात मान्य होऊन बहुतेक प्रसिध्द व रसिकमान्य नाटके मेघदूत व रघूवंश अशी काव्ये मराठीत अवतीर्ण झाली. इंग्रजीतून कथा, नाटके व काव्ये यांची मराठी भाषांतरे होत होती. इ.स. १८५७ ते १८७४ या कालखंडात ललित वाङमयाचा प्रारंभ झाला.

परशुरामपंत तात्यांनी संस्कृत नाटके मराठीत आणली परशुरामपंत गोडबोले, लेले, राजवाडे प्रभुतींनी शाकुंतलादीं राज्य संस्कृत नाटकांचा उतारा करुन सर्व लोक समाराधनाचा एक अभिनव मार्ग मराठीत खुला केला. संस्कृत भाषेतील काही प्रसिध्द नाटकांची व धर्मग्रंथाची भाषांतरे केली गेली. संस्कृत नाटके मराठीत आणली. प्रबोध-चंद्रोदय, विणूमोरवसीय, वेणीसंहार, उत्तमराम चरित, शाकुंतल, मृच्छकटिक, मातृविकाग्निमित्र, प्रसन्नराघव, थोरले माधवराव पेशवे, जयपाल मनोरमा, प्रबोध वियुत किंवा स्वैरसकेशा, नीलदर्पण ही सर्व नाटके भाषांतरीत झाली. विष्णुदास भावे यांची नाटके याच काळात अवतरलेली आहेत.

आधुनिक नाटक हे खूप उशिरा विकसित झाले असले तरी नाटक हा वाङ्मय प्रकार भारताला परंपरेने परिचित आहे. संस्कृत नाट्यवाङ्मय हे भारतीय संस्कृतीचे भूषण मानले जाते. मात्र प्राचीन मराठी वाङ्मयात नाटक का उपेक्षिले गेले हे समजू शकले नाही. इ.स. १८४२ पर्यंत नाटकाची, नटाची, नाट्य वाङ्मयाची इतकी उपेक्षा परंपरा असूनही झाली . हा मात्र इतिहास आहे. मराठी नाटक निर्माण कसे झाले? त्यामागील प्रेरणा व परंपरा कोणत्या? त्याचा विकास कसा झाला? याचा विचार करतांना असे सांगण्यात येते की, मराठी नाटक हे दशवितारी खेळ, भारुडे, किर्तने, ललिते, गोंधळ, कळसुत्री बाहुल्यांचे खेळ, रास, तमाशे इत्यादी रंजन प्रकारातून उत्क्रांती होत गेले मराठी नाट्य वाङ्मयाला व एकूणच नाटकाला आचे जे भरघोस आणि रसरसीत स्वरुप प्राप्त झाले आहे, त्याची मुळे या वरील परंपरेतून खोलवर रुजलेली आहेत. खऱ्या अर्थाने संस्कृत भाषेतील नाट्यवाङ्मय हे जागतिक साहित्याचे अमर लेणे आहे. अशा सुंदर संस्कृत नाटकांचा आदर्श समोर असतांनाही प्राचीन मराठी वाङ्मयाने नाट्यवाङ्मयाच्या निर्मितीच्या बाबतीत कमालीची उपेक्षा वृत्ती धारण केलेली दिसते.

प्राचीन मराठीने केलेल्या दिर्घकालीन उपेक्षेचा परिणाम असा झाला की, इंग्रजी आमदानीत १९ व्या शतकाच्या पुर्वार्धात जी मराठी नाटके रंगभूमीवर येऊ लागली त्याची आवस्था परंपरेच्या अधिष्ठानाच्या अभावामुळेच जन्मास येऊन नुकत्याच सांगावयास शिकू लागलेल्या अर्भकासारखी दृष्टीस पडू लागली. इ.स. १८४३ मध्ये विष्णूदास भावेंच्या सितास्वयंवर या पहिल्या मराठी नाटकाचा प्रयोग झाला तेव्हापासून मराठी नाट्यकलेला आत्मविश्वासाने आणि कलापूर्ण पध्दतीने ताठ उभे रहावयाला १८८० मध्ये आण्णासाहेब किर्लोसकरांच्या 'शाकुंतल' या नाटकाचा प्रयोग होईपर्यंतच्या म्हणजे तब्बल तीन तपांचा काळ जावा लागला. इ.स. १८४३ पासून १८८० प्र्यंत मराठीत जी नाटके झाली त्यांनी मराठी नाट्यवाङ्मयात फारशी मोलाची भर घातली असे दिसत नाही. पण पुढे अण्णासाहेब किर्लोसकारांनी जे रम्य नाट्य मंदिर उभारले त्याचा पाया घालण्याचे महत्त्वाचे ऐतिहासिक कार्य या प्रारंभिक आवस्थेतल्या नाटकांनी केले हे अमान्य करता येत नाही. उत्तर कानडा प्रांतातील भागवत नावाच्या दशावतरी खेळ करण्याऱ्या मंडळींचे सांगली येथे झालेले काही खेळ पाहून त्यात काही इष्ट सुधारणा करुन सांगलीच्या श्रीमंत चिंतामणराव पटवर्धनाच्या प्रोत्साहनापासून स्फुर्ती घेऊन त्या पटवर्धनांचे १८४३ मध्ये 'सितास्वयंवर' या पहिल्या नाटकाचा प्रयोग करुन दाखविला आणि विष्णुदास भावेंच्याच शब्दात सांगायचे झाले तर ही फार दिवसापासून राष्ट्रीय करमणूक बंद पडली होती तिचे उज्जवलन झाले मराठी नाटकांचा उदय होण्यासाठी उशीर झाला असला तरी त्याची बीजे मात्र पोवाडे, भारुडे, दशावतारी खेळ, कळसुत्री भावल्यांचा नाच इत्यादी मध्ये दिसून येतात. पोवाडा हे एक प्रकारचे नाटक आहे. त्यात अनेक पात्र असतात. मुख्य शाहीर व त्याचा साथीदार हे दोघे पोवाड्यातील व्यक्तींच्या सोबत बतावणी करतात. नाटकात ज्याला सुत्रधार म्हणतात व ज्याचे काम नाटाकतील संविधानाचे सूत्र अथपासून इथपर्यंत संबंध ठेवायचे व उकलवायचे असते. सुत्रधाराचे तिऱ्हाइतपणाचे काम शाहीर करत असतो. मध्ययुगीन काळापासून महाराष्ट्रात भारुड हे लोकप्रिय आहे. ललिते हा

मराठीतील प्रारंभीचा नाट्यप्रकारच म्हणावा लागेल. वासुदेव, दंडीगाण, चोपदार, भालदार इत्यादी सोंगे आणून कथा किर्तनातून ललिते होत असत. देवादिकाच्या लिला दृष्य स्वदपात वर्णन करण्याची तत्कालीन प्रथा होती. ललितांसाठी रंगमंचही तयार करण्यात येत असे. थोडक्यात मराठी नाट्यांची बीजे बहूरंगी लिलातूनही सापडण्यासारखी आहेत. पुर्वीच्या पौराणिक नाटकातील पडद्यावर केवळ शंकर, गणपती वगैरे देवांची ओबड-धोबड चित्रे काढलेली असत. परंतू बुशिक नाटकातील पडद्यावर रस्ता देऊळ, बाग, महाल, डोंगर, जंगल, नदी वगैरेंची दृष्ये दिसू लागली होती या काळातील नाटकात स्वतंत्र रचना ऐतिहासीक विषयाची निवड वेचक प्रसंग योजना, पात्रांचा स्वभाव, परिपोष प्रसन्न भाषाशैली या गुणांमुळे नाटक हे वाचकप्रिय झाले. या कालखंडातील नाट्यवाङमयावर सेक्सपिअर या इंग्रजी नाटककाराचा फार मोठा पगडा दिसून येतो. त्यांच्या अनेक इंग्रजी भाषेतील नाट्यकृतींची मराठी भाषेत भाषांतरे करण्यात आलेली आहेत. या काळात इंग्रजी नाटकाचे मराठीत रुपांतर करण्याची प्रथाच सुरु झालेली होती.

**संस्कृत नाटकांची भाषांतरे:**

प्रामुख्याने नाट्यवाङमयाचा प्रारंभ हा संस्कृत नाटकाच्या भाषांतराने झाला आहे. कारण इंग्रजी पेक्षा संस्कृत भाषा ही अत्यंत जवळची, संस्कृत साहित्यामध्ये मुरलेली, पुण्याच्या पाठशाळेतून तयार झालेली शास्त्रीय मंडळी याच सुमारास वाङमय सेवेस सिध्द झालेली होती. याच वाङमय सेवेत सिध्द झालेल्या भाषांतरकारामध्ये त्यांच्याहून काहीसे वडील असलेल्या परशुरामपंत तात्या गोडबोले हे नेतृत्त्व प्रामुख्याने त्यांना मिळाले होते. कालानुक्रमे पाहिले तर बुशिक नाटकांच्या सुमारे दहा वर्षे अगोदर संस्कृत नाटकांची गद्य पद्यात्मक भाषांतरे मराठीत व्हावयास झाली होती. त्यामध्ये परशुरामपंत तात्या गोडबोले यांचे वेणीसंहार हे नाटक इ.स. १८५७ मध्ये प्रसिध्द झाले. यानंतर गोडबोले यांनी पाच नाटकांचे अनुवाद केले. उत्तरामचरित, शाकुंतल, मृच्छकटित, नागानंद पार्वतीपरिणय ही नाटके मराठी भाषेमध्ये अनुवादीत केली. या सर्व नाटकांची भाषांतरे इ.स. १८५७ ते १८७२ या काळात केलेली आहेत. परशुरामपंत तात्या गोडबोले यांनी भाषांतर करतांना सुसंस्कृत भाषेला प्राधान्य न देता प्रामुख्याने बोली भाषेला दिले. मराठी भाषेची प्रकृती लक्षात घेऊन रसाळ भाषांतरे केली. त्यामुळेच भाषेला वळण व सुडौलपणा यांची प्राप्ती करुन दिली. नाट्यकला व नाट्यवाङमय या मधील काही नव्या प्रथा सुरु केल्या. गोडबोले यांनी गद्याचे गद्य व पद्याचे पद्य अशीच प्रकारे केली. यांचे कवित्व, त्यांची रसिकता, भाषाज्ञान यांचा प्रत्यय ठिंकठिकाणी तसेच काव्याचे भाषांतर करताना मराठीच्या मुळ स्वरुपाचे रक्षण करुन तो अधिक सुंदर कसा होईल. याकडे तात्यांनी प्रामुख्यांने लक्ष पुरंविले आहे. त्याची कवित्व सद्‌गुणयुक्त आहे. संस्कृत नाटकातील जडपणा, आळस, अज्ञान कठिणता, दोष हिच विद्वतेची डौल काढून टाकून त्यांना गोडबोले यांनी सुलभ पण शोभादायक मराठी साद दिला.

परशुराम तात्या गोडबोले यांच्या नाट्य लेखनावर अभिप्राय देतांना प्रा.ई.वि.तुळपुळे म्हणतात, "तात्यांच्या ओव्या, साक्या दिंड्या पदे निः संशय शुध्द रसाळ मराठी कवितेचे नमुने होत.

परशुरामपंत तात्या गोडबोले यांच्याच पठडीतले कृष्णशास्त्री राजवाडे यांनी मालतीमाधव (इ.स. १८६१) मुद्राराक्षस (इ.स. १८६७) शाकुंतल (इ.स. १८६९) शाक्य मौर्यवंशीय (इ.स. १८७४) ही नाटके गोडबोले यांच्याच पध्दीतीनेच भाषांतरे केली आहेत.

गणेशशास्त्री लेले यांनी जानकी परिणय (इ.स. १८६५) मालविकाग्निमित्र (इ.स. १८६७) विद्व शालभंजिका (इ.स. १८६९) कर्पुरमंजरी (इ.स. १८७७) यांनी ही या इतर नाटकांची भाषांतरे केली.

रा.भि. गुजीकरांनी शांकुतल (इ.स. १८७०) हे नाटक भाषांतरीत केले. वासुदेव नारायन डोंगरे यांनी मालकी मालती माधव (इ.स. १८८५) व श्री हर्षकृत रत्नावली (इ.स. १८८३) ही नाटके भाषांतरीत केली. सी.म.मांजरेकरांनी 'वेनीसंहार' (इ.स. १८८८) हे नाटक भाषांतरीत केले. भास्कर अनंतशास्त्री ताम्हणकर व गणेश अनंतशास्त्री अभ्यंकर यांनी 'विक्रमोर्वशीय' (इ.स. १८७२) हे नाटक भाषातरीत केले.

स.बा.सरनाईक यांनी 'जानकी परिणय' आणी विष्णू दाजी गद्रे यांनी 'श्रीहर्षकृतश्रेयदर्शिका' (इ.स. १८८४) व नागानंद (इ.स. १८८३) ही नाटके मराठीत आणली. हे सर्वजन व्युत्पन्न व रसिक पंडीत होते. यांची भाषाशैली भारदस्त व कवितांची धाटनी चिंताकर्षक आहे. परंतु या सर्व भाषांतरकारांची नाटके ही प्रयोगशाळा उपयोगी अशी रचना झालेली दिसत नाही. तसेच नाट्यकलेचे उदिष्ट डोळयापुढे ठेवून यांची रचना झालेली दिसत नाही. म्हणूनच नाट्यवाङ्यमयामध्ये यांची गणना करणे योग्य वाटत नाही. थोडक्यात ही भाषांतरे फारशी सरस झालेली नाहीत. त्यामुळेच ती प्रयोगशाळा नव्हती. त्यामुळेच या नाटकांचे प्रयोग करतेवेळी त्यामध्ये बरेच फेरफार करावे लागले. यावरील नाटकात काही नाटकांची एकाहून अधिक भाषांतरे झालेली दिसून येतात. सर्वात जास्त भाषांतरे ही 'शांकुतल' या नाटकांची झालेली आहेत. प्राधान्याने कलादृष्टया तर आपण पाहिले तर 'बुकिश' नाटकांनाच प्राधान्य देता येते. बुकिश नाटक बऱ्याच प्रमाणात रंग भूमीवर आली व काही अशी त्या दृष्टीनेच ती लिहिली गेली होती असेच दिसून येते. संस्कृत नाटकांची भाषांतरे काही प्रयोगात आली हे खरे आहे. परंतु ती बरीच उशीरा आली आहेत. ती मुळातच प्रयोगाच्या दृष्टीने लिहिलेली दिसत नाहीत. वाचायला ती कितीही चांगली वाटली तरी रंगभुमीवरील प्रयोगात ती वीजोड व कंटाळवाणी वाटल्याखेरीज राहानार नाहीत. इंग्रजी विद्येच्या प्रसारामुळे अभिरुची मध्ये सुधारणा झाली व आपल्या संपन्न अशा संस्कृत नाट्य वाङ्मयाकडे शास्त्रीमंडळीचे लक्ष गेले. विद्यापीठातून संस्कृत व इंग्रजी वाङ्मयाचा अभ्यास वाढला अशाच वेळी नाटकाच्या इतिहासात नाटकाचे सर्वात जुने आणि छापलेले असे पहिले पुस्तक म्हणून मान मिळाला तो 'प्रबोध चंद्रोदय' हे संस्कृतभाषेतून आणलेले आणि मराठी भाषेतील पहिले नाटकाचे पुस्तक होय. ११ व्या शतकातील संस्कृत नाटककार श्रीकृष्ण मिश्र पंडित यांच्या या नाटकाचे मराठी भाषांतर हे सदाशिव बाबाशास्त्री अमरापुरकर व बापुजी शास्त्री बापट यांनी केले. मराठी भाषेतील पहिले 'रूपाकात्मक नाटक' म्हणून ही या नाटकाचा गौरव केला जातो. हे नाटक शास्त्रींनी ओवीनिष्ठ स्वरूपात भाषांतरीत केलेले आहे. हे नाटक सहा अंकी आहे. या नाटकात आत्मा आणि परामात्मा हे एकच असतो. याचेच समर्थन करण्याचा प्रयत्न केला आहे. अशा प्रकारचा गहन व रुक्ष असा विषय लोकांच्या गळी उतरविण्यासाठी हे 'अन्योकरुप' नाटक लिहिले गेले आहे. 'प्रबोध चंद्रोदय' या नाटकातील सहाअंकापैकी केवळ तीन अंकाचेच भाषांतर अमरापुरकर व बापट या शास्त्री यांनी केले. 'प्रबोधचंद्रोदय' या अन्योक्तीरूप नाटकाचा पायाच घातला. म्हणून अशा स्वरूपाची नाटके पुढे लिहिलेली दिसतात. उदा. विचार सार, सायुज्य सदन, संसार - अंत:पुर, 'पर्यटन रूपक' इ. नाटके लिहिली गेली. त्यांच्या लेखनावर 'प्रबोध चंद्रोदय' या नाटकाचा परिणम झाला असावा. या वरील नाटकामध्ये पाप, प्रसाद आणि पश्चाताप यांना मानवी रूपात रंगभूमीवर आणण्यात आले.

**संदर्भग्रंथ :**

१) साहित्याचे मानदंड, गंगाधर गाडगीळ. पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९६२.
२) प्रवासवर्णन एक वाङ्मयप्रकार, वसंत सावंत, महाराष्ट्र राज्य साहीत्य व संस्कृती मंडळ, मुंबई.
३) जागतिकीकरण आणि मराठी साहित्य, संपादक डॉ. शरद गायकवाड स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
४) वाटचाल, वा.ल.कुलकर्णी, मुंबई, १९५६.
५) हिमालयातील प्रवास, काका कालेल. (अनु. भाऊ धर्माधिकारी, पुणे.

केल्यानें होत आहे रे । आधीं केलेचीं पाहिजे ।।

भारतीय-शिक्षण-प्रसारक-संस्था-अम्बाजोगाईनगरी

## स्वातन्त्र्यवीरसावरकर-महाविद्यालयः बीड (चम्पावतीनगरम्)

## ।। संस्कृत विभाग ।।

डॉ.बाबासाहेब–आम्बेडकर–मराठवाडा–विश्वविद्यालयः औरङ्गाबाद् इत्यनयोः

संयुक्ताश्रयेन आयोजिता

# राष्ट्रीय-संस्कृत-परिषद्

## संस्कृत-मराठी-ऋणानुबन्धः

आङ्ग्ल दिनाङ्कः १४ मार्च २०२०

# प्रमाणपत्रम्

सानन्द प्रमाणीक्रियते यत् श्रीमान्/श्रीमती डॉ. सोनटक्के राजाराम तुकाराम

महाविद्यालयः कला, वाणिज्य व विज्ञान महा. आष्टी महोदयेन/महोदयया स्वा.सावरकर-महाविद्यालये

आयोजितायां संस्कृतपरिषदि २०२० ख्रिस्ताब्दे मार्चमासस्य १४ दिनाङ्के: सोत्साहं सहभागं स्वीकृतम्

संस्कृत व मराठी नाटकांचा अभ्यास विषयम् अनुसृत्य/शोधनिबन्धः प्रस्तुतः/मार्गदर्शनम् कृतम् ।

भवतः/भवत्याः वर्धमानकर्तृत्वं भारतमातुः चरणे समर्पितं भवेत् इति ।

प्रा.सचिनः कंदले
संस्कृतविभागप्रमुखः

डॉ.संजय शिरोडकरः
प्रधानाचार्यः